ॐ सोऽहम् आनंद

प्रेम

ज्ञान



।। आत्मपूजा ।।


तत्वज्ञ

ब्रह्मश्री प्रियोत्तमानंद महाराज

शांती

आनंद

सिध्दबोध क्षेत्र, सावरगांव, ता. परतूर, जि. जालना.


श्री योगेश्वरी माता
अंबाजोगाई



स्वामी स्वरुपानंद महाराज

पावस, जि. रत्नागिरी

ॐ सोऽहम्

।। आत्मपूजा ।।

तत्वज्ञ प्रियोत्तमानंद महाराज

संत प्रियोत्तम कहे हमारा आत्मग्यान बीन नही सहारा

आत्मपूजा हा ग्रंथ प्रियोत्तम तत्वज्ञानाचा मुख्य धर्म. यात प्रियोत्तम तत्वज्ञानाचे सार आहे. ते नित्य पारायणात प्रियोत्तम भक्तांनी घेतले पाहिजे. यात भक्ती, ज्ञान, आत्मभाव दर्शन, आत्मस्वरूपाची सिद्धता आहे. यात तत्वज्ञानाचे व प्रियोत्तम धर्माचे सार आहे. तरी सर्वांनी हा ग्रंथ संग्रही ठेवावा.

– मंगलमूर्ती ब्रह्मश्री प्रियोत्तमानंद

सावरगाव

प्रकाशक	:	सौ सविता गजानन धोकटे, संगमनेर
प्रकाशन तिथी	:	मार्गशिर्ष शु. १५ शके १९३१
दिनांक	:	२ डिसेंबर २००९
अक्षरजुळणी	:	आनंद कॉम्प्युटर्स, अ.नगर
मुद्रक	:	आनंद मुद्रणालय, चितळे रोड, नेहरु मार्केट समोर,अहमदनगर फोन : २३४३३१९
मूल्य	:	ज़ोगवा
संपर्क पत्ता	:	प्रियोत्तम पीठ, सिद्धबोध क्षेत्र,सावरगाव पो.धामणगाव (पिंपळी) द्वारा : आष्टी (धो.जो.) ता.परतुर,जि.जालना फोन : (०२४८४) २२९०६८ व ६९१७९३ मो. ९८८१७४१६७९

|| ॐ सोऽहम् ||

|| ॐ मंगलमूर्ती ब्रह्मश्री प्रियोत्तमाय नमः||

|| ॐ आनंद ||

|| श्री योगेश्वरी नामावली ||

अंबेजोगाई जिल्हा बीड

१) ॐ ब्रह्मरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः।

२) ॐ चैतन्यरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

३) ॐ आत्मरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

४) ॐ अनंतरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

५) ॐ सर्वज्ञरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

६) ॐ स्वयंभूरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

७) ॐ अविनाशीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

८) ॐ नित्यरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

९) ॐ सर्वव्यापीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१०) ॐ अव्यक्तरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
११) ॐ निर्गुणरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१२) ॐ सगुणरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१३) ॐ ज्ञानरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१४) ॐ प्रेमरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१५) ॐ शांतीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१६) ॐ आनंदरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१७) ॐ तपरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१८) ॐ पार्वतीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१९) ॐ मातृरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
२०) ॐ स्त्रीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
२१) ॐ कुमारीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

२२) ॐ मंगलरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

२३) ॐ शिवशक्तीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

२४) ॐ सर्वसंपन्नरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

२५) ॐ विद्यारुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

२६) ॐ आदिशक्तीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

२७) ॐ तेजरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

२८) ॐ क्षमारुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

२९) ॐ दयारुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

३०) ॐ सौभाग्यरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

३१) ॐ कल्याणरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

३२) ॐ परमार्थरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

३३) ॐ सतरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

३४) ॐ चितरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

३५) ॐ आनंदरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
३६) ॐ श्रद्धारुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
३७) ॐ धृतीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
३८) ॐ चितशक्तीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
३९) ॐ शमरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
४०) ॐ दमरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
४१) ॐ ध्येयरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
४२) ॐ निष्ठारुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
४३) ॐ धर्मरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
४४) ॐ भक्तिरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
४५) ॐ कर्मयोगरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
४६) ॐ ध्यानरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
४७) ॐ समतारुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

४८) ॐ दैवीगुणरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
४९) ॐ स्मृतीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
५०) ॐ विवेकरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
५१) ॐ वैराग्यरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
५२) ॐ संयमरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
५३) ॐ पवित्ररुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
५४) ॐ सत्वरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
५५) ॐ निर्मोहरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
५६) ॐ निर्भयरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
५७) ॐ स्वाध्यायरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
५८) ॐ प्रज्ञारुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
५९) ॐ दक्षरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
६०) ॐ साक्षीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

६१) ॐ स्वामीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
६२) ॐ हृदयनिवासीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
६३) ॐ सख्यत्वरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
६४) ॐ वृध्दीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
६५) ॐ संपन्नरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
६६) ॐ सौंदर्यरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
६७) ॐ आरोग्यरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
६८) ॐ आर्युरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
६९) ॐ आत्मसौख्यरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
७०) ॐ निर्वैररुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
७१) ॐ निर्विकाररुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
७२) ॐ भक्तवत्सलरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
७३) ॐ शीलरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

७४) ॐ पतीतपावनरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
७५) ॐ सिद्धरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
७६) ॐ जयश्रीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
७७) ॐ यशकीर्तीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
७८) ॐ मधुरशब्दरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
७९) ॐ निर्मलरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
८०) ॐ प्रियदर्शनरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
८१) ॐ वर्धमानरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
८२) ॐ सत्यप्रकाशरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
८३) ॐ संरक्षणरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
८४) ॐ स्व-रुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
८५) ॐ सर्वश्रेष्ठरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
८६) ॐ दिव्यरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

८७) ॐ बुद्धीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

८८) ॐ सर्वप्रभारुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

८९) ॐ प्रतिभारुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

९०) ॐ वाङ्मयरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

९१) ॐ तत्त्वनिष्ठरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

९२) ॐ तत्त्वरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

९३) ॐ प्रसन्नरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

९४) ॐ सौख्यरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

९५) ॐ स्पर्शरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

९६) ॐ वरदायिनीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

९७) ॐ तिर्थरुपरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

९८) ॐ जीतेन्द्रीयरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

९९) ॐ आत्मसंयमीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

१००) ॐ कल्याणरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१०१) ॐ वंशरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१०२) ॐ योगरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१०३) ॐ कृपारुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१०४) ॐ नामरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१०५) ॐ मेधारुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१०६) ॐ प्रियोत्तमादेवीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१०७) ॐ ब्रह्मेश्वरीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।
१०८) ॐ संचारशक्तीरुपे महादेवी योगेश्वरी नमो नमः ।

***

।। श्री योगेश्वरी प्रणमस्तु ।।

ॐ आनंद आनंद आनंद

प्रियोत्तम गायत्री मंत्र

ॐ प्रेम स्वरूपाय विन्महे ।

चैतन्यमय राधाकृष्ण अवतारी तत्वज्ञ प्रियोत्तमयधिमहे ।

तन्ने ब्रह्मश्री प्रचोदयात ।।

ॐ शांती शांती शांती

ॐ आनंद आनंद आनंद

।। श्री प्रियोत्तमादेवी प्रसन्न ।।

सच्चिदानंद रुपायै । प्रतिचैतन्य रुपिणे ।

नमो वेदांत वैद्यायै । महसेऽमित तेजसे ।।

।। प्रियोत्तमायोग तत्त्वदर्शन ।।

प्रेम ज्ञान

ॐ सोऽहम्

शांती आनंद

सोऽहम् भाव असू द्यावा । प्रियोत्तमयोग आचरावा ।।

– प्रियोत्तमानंद

दीपज्योतिर्परब्रह्म । दीपज्योतिर्भगवती ।
दीपज्योतिर्महादेवि । दीपज्योतिर्नमोस्तुते ।।

।। प्रार्थना ।।

ॐ सोहऽम् ब्रह्मस्वरुपाय नमः ।
ॐ प्रेम ब्रह्मस्वरुपाय नमः ।
ॐ ज्ञान ब्रह्मस्वरुपाय नमः ।
ॐ शांती ब्रह्मस्वरुपाय नमः ।
ॐ आनंद ब्रह्मस्वरुपाय नमः ।
ॐ प्रियोत्तमादेवी ब्रह्मस्वरुपाय नमः ।
ॐ प्रियोत्तमतत्व ब्रह्मस्वरुपाय नमः ।

ॐ आनंद

।। जय माताजी ।।

।। श्री सद्गुरु स्वामी स्वरूपानंद यांचा शुभाशीर्वाद ।।

हरिस्मरणपूर्वक सप्रेम आशिर्वाद

माझा तुम्हास सदैव आशीर्वाद आहे.

तुमच्या प्रेरणेने कधीही लिहित जावे.

घडे जे स्वभावे । कर्म ते आवघे ।

भावे समर्पावे । हंरी पायी ।।

आत्मधर्म पुस्तकासंबधी माहिती समजली आनंद झाला.

– स्वरुपानंद

सकल धर्मामध्ये धर्म । स्वरूपी राहणे हा स्वधर्म ।

याहूनि इतर सर्व अधर्म । श्रुति विहित जरी वेदेश्वरी ।।

– शिवगीता

स्वरूपानुसंधान सर्वदा । धर्म जगाचा एक ।
कळाया हवा तरी पहावा । नित्यनित्य विवेक ।।

–स्वरुपानंद

भक्तांची कामना पुरविता देव ।
असो द्यावा भाव तया पायी ।।

– स्वरुपानंद

सकळ धर्मामध्ये धर्म । स्व–स्वरूपी राहणे हा स्वधर्म ।।

– समर्थ

ॐ

प्रियोत्तमाची माता पिता । वेद उपनिषद गीता ।।

।। वेद ।।

" विज्ञान आनंद ब्रह्म"

ब्रह्म हे स्वयंप्रकाश ज्ञानस्वरुप आणि आनंदस्वरूप आहे.

।। श्रुति ।।

" प्रियब्रह्म " ब्रह्म प्रेमभाव आाहे.

।। उपनिषद ।।

'प्रज्ञानंब्रह्म '(ऐ.)ब्रह्म उत्कृष्ट ज्ञान स्वरूप अथवा चैतन्य स्वरूप आहे.

" अहंब्रह्मास्मि" (बृ.) तेच ब्रह्म मी आहे.

" तत्त्वमसि" (छां.) तेच ब्रह्म तू आहेस.

"अयमात्मा ब्रह्म" (मांडुक्य) हाच आत्मा ब्रह्म आहे.

" एषत् आत्माऽन्तर्याम्यमृतः"

हाच आत्मा तुमच्या अंतःकरणात अमृत स्वरूप आहे.

" सर्व खल्विदं ब्रह्म "

हे सर्व विश्व ब्रह्ममयच आहे.

" सर्वोहं विमुक्तोऽहम्" मी सर्वरूप आहे. मुक्त आहे.

" योऽस्ते सोऽहं सः सोऽहमास्मि"

जो तो आहे तोच मीआहे. मी तो आहे व तो मी आहे.

" आत्मानमेव लोकमुपासित्" (बृ.)

आत्मरूपी फलांचीच उपासना करावी.

" आत्मैवास्य ज्योतिर्भवति" (बृ.)

आत्मा हाच जीवाचा प्रकाश असतो.

“ आत्मद्वारे दृष्टव्य: श्रौतव्य: निदिध्यासितव्य:”
आत्माच पहावा, त्याचेच श्रवण करावे,
त्याचेच ध्यान करावे.

।। गीता ।।

श्रद्धावांल्लभते ज्ञानं तत्पर:संयतेंद्रिय: ज्ञानंलब्ध्वा
परांशांतीमचिरेणाधिगच्छति ४-३९

श्रद्धाळू आणि तत्पर पुरुष इंद्रिय संयम करुन ज्ञान प्राप्त करतो.
ज्ञान प्राप्त झाल्याने लौकरच त्याला परम शांती मिळते.

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानव:।
आत्मन्येव च सन्तुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ।।

जो आत्म्यामध्ये रमतो, आत्म्यानेच तृप्त होतो आणि आत्म्यातच
संतुष्ट राहतो त्याला कोणतेही कर्तव्य शिल्लक रहात नाही.

ॐ सोऽहम्

।। प्रियोत्तम तत्त्वविचार ।।

प्रियोत्तमाची वाणी लेखणी । ही सारी ईश्वरी करणी ।
विश्वास ठेवा अंत:करणी । कल्याण असे मानवा ।।
नित्य नेमे दीपपूजन । अखंड करी सोऽहम् स्मरण ।
तत्त्वविचाराचे पारायण । कधी न सोडावे ।।

ॐ

श्री जगदंबेने सुचविले । श्री सद्गुरु कृपेने लिहिले ।
प्रियोत्तम तत्त्व अवतरले । अमर झाले भूमंडळी ।।
हा ज्ञानयज्ञाचा प्रसाद । भक्तिभावे घ्यावा स्वाद ।
चिंतन मनन करी निर्विवाद । स्व-स्वरूपी पावेल तो ।।

卐 卐 卐

।। ॐ सच्चिदानंद स्वरूपिणी प्रसन्न ।।

प्रथम वंदितो मंगलमूर्ती । विचार लिहिण्या द्यावी स्फूर्ती ।
प्रियोत्तमावर असावी भक्ती । दृढ भावे आमुची ।।१।।
दुसरे वंदन श्री सरस्वतीला । शारदा अंबा देवीला ।
प्रतिभा प्रेरणा द्यावी मजला । प्रियोत्तमतत्त्वाची ।।२।।
तिसरे वंदन श्री योगेश्वरीला । कुलस्वामिनी श्री जगदंबेला ।
दिव्य शक्तीची प्रेरणा मजला । देई माते जगदंबे ।।३।।
चौथे वंदन परब्रह्माला । निर्गुण निराकार स्वरूपाला ।
स्व-स्वरूपी ओळख दे मला । अंतर्यामी जे आहे ।।४।।
पाचवे वंदन सद्गुरुला । परब्रह्म स्वरूपानन्दाला ।
आशीर्वाद द्यावा मजला । प्रियोत्तम कार्य करावया ।।५।।

ॐ सोऽहम्

श्री शिव पार्वती ऋषी मुनी । तत्वसिद्ध सद्गुरु ज्ञानी ।
संत महंत विचारवंतांनी । सोऽहम् सोऽहम् बोलला ।।६।।
प्रभातकाळी उठावे । शुचिर्भूत निर्मळ व्हावे ।
सोऽहम् सोऽहम् जपावे । भक्तिभावे ।।७।।
सोऽहम् जपावा सर्वकाळ । न लगे कांही काळ वेळ ।
सदा सर्वदा तळमळ । अंतरी जयाची ।।८।।
अंतरी भाव सोऽहम्चा प्रियोत्तम तत्त्वविचाराचा ।
आत्मस्वरूप प्रेमाचा । भक्तिभाव असे ।।९।।
सोऽहम् प्रेमस्वरूप । प्रेम आहे ज्ञानरूप ।
ज्ञान आहे आनंदरूप । आनंद रुपे शांती ।।१०।।
आपणास सुख असावे । ऐसे जीवा वाटे स्वभावे ।
म्हणूनि अखंड सोऽहम् जपावे । तेणे सुख पावाल ।।११।।

सुख नाही शांतीविण । शांती नाही ज्ञानविण ।
ज्ञान नाही प्रेमाविण । सोऽहम् भाव भक्तीच्या ।।१२।।
सोऽहम् म्हणजे तो मी । तो म्हणजे आत्मा मी ।
आत्मा तो परमात्मा मी । स्वयं प्रकाशरुप ।।१३।।
स्वरूप प्राप्ती सोऽहम्ने । सोऽहम् जपावा चिंतनाने ।
चिंतन करावे विवेकाने । प्रियोत्तम मार्गे ।।१४।।
आत्मानात्म विचार । हा साधकाचा आचार ।
सोऽहम् भावाचा प्रचार । अंतरात असे ।।१५।।
तत्त्वविचारांचे वाचन । त्या विचाराचे मनन ।
सोऽहम् भावाचे चिंतन । प्रियोत्तमाने करावे ।।१६।।
संयम पावित्र्य साधेपणा । हा साधकाचा आहे बाणा ।
सोऽहम् सोऽहम् अखंड म्हणा । प्रियोत्तम भावे ।।१७।।
श्रद्धा विवेक चिंतन । हे साधकाचे व्रत जाण ।
सरळ राहे निरहंकारीपण । सोऽहम् सोऽहम् अंतरी ।।१८।।

साधन मार्ग प्राप्तीचा । सोऽहम् सोऽहम् भाव जपाचा ।
चिंतन मनी ध्यास त्याचा । प्रियोत्तम भावे ।।१९।।
सोऽहम् भाव कळला ज्यासी । आत्मप्रेम करतो सर्वांसी ।
शांती ज्ञान प्रसन्नतेसी । संलग्न राहे नित्य ।।२०।।
सोऽहम् सर्व नामामध्ये श्रेष्ठ । जपांमध्ये सोऽहम् वरिष्ठ ।
अखंड चिंतन करणे इष्ट । स्व-स्वरूप पावावया ।।२१।।
सदा प्रेमळ निर्मळ । स्व स्वरूपी निश्चल ।
सोऽहम् जपावे सर्वकाळ । तो प्रियोत्तम जाणावा ।।२२।।
स्व स्वरूपी दृढ श्रद्धा । विपती अथवा सपंदा ।
सोऽहम् अंतरी सर्वदा । तो प्रियोत्तम जाणावा ।।२३।।

।। प्रियोत्तम तत्त्वयोग ।।

सच्चिदानंद महत्तत्व । अनादिसिद्ध परमतत्त्व ।
अविनाशी स्वयंभू जे तत्त्व । ते तत्त्व प्रियोत्तमाचे ।।२४।।

अव्यय अक्षर सर्वव्यापी । अजर अमर सर्वरूपी ।
स्फूर्तिदायक चैतन्यरूपी । ते तत्त्व प्रियोत्तम ।।२५।।
ज्ञेय कूटस्थ ब्रह्मरूप । प्रेम ज्ञान शांतीरूप ।
आनंद सुख स्वरूप । ते तत्त्व प्रियोत्तम ।।२६।।
स्फूर्तीतून विश्व झाले । चराचरी प्राण आले ।
प्राणिमात्र अनंत जन्मले । ब्रह्मशक्तीने ।।२७।।
तत्त्वातुनी जन्मला परमेश । त्यास म्हणती जगदीश ।
हाच विश्वव्यापी ईश । ते तत्त्व प्रियोत्तम ।।२८।।
सच्चिदानंद स्वरूपिणी । ही प्रगटली ब्रह्मस्फूर्तीतुनी ।
जी स्फूर्ती तत्त्वस्वरूपिणी । ते तत्त्व प्रियोत्तम ।।२९।।
तत्त्वातूनि निर्मिला शिव । उपाधीने झाला तो जीव ।
जीव आणि शिव एकमेव । ते तत्त्व प्रियोत्तम ।। ३०।।

आत्मा सर्वांच्या अंतरी। कर्ता करविता तोच हरी ।
सर्वत्रांचा सांभाळ करी । ते तत्त्व प्रियोत्तम ।।३१।।
आनंदस्वरूप परमात्मा । परमात्मा तोचि प्रेमात्मा ।
दोन्ही स्वरूप एकच आत्मा । हे तत्त्व प्रियोत्तम ।।३२।।
आत्मा आहे शांत रूपी । ज्ञान आहे आत्मरूपी ।
शांती ज्ञान एकरूपी । हे तत्त्व प्रियोत्तमाचे ।।३३।।
प्रेम ज्ञान आत्मस्वरूप । आनंद ज्ञान ब्रह्मरूप ।
हे सर्वही एकच रूप । हे तत्त्व प्रियोत्तमाचे ।।३४।।
स्वरूप सच्चिदानंदघन । हेचि तुझे स्वरूप जाण ।
अद्वैती निष्ठा भावपूर्ण । हे तत्व प्रियोत्तमाचे ।।३५।।
अवघे विश्व ब्रह्मरूप । ब्रह्म हे सत्य स्वरूप ।
पिंडीही तेच स्वरूप । हे प्रियोत्तम तत्त्व ।।३६।।

जेथे तेथे चैतन्य आहे । एक स्वरूप सर्वत्र राहे ।
ऐसी प्रचिती घेत राहे । हे तत्त्व प्रियोत्तमाचे ।।३७।।

सद्‌गुरु आणि परमात्मा । दोन्ही स्वरूप एकच आत्मा ।
एकच पाही मूळ तत्त्वता । हे तत्त्व प्रियोत्तमाचे ।।३८।।

ईश्वरकृपेवीण गुरुलाभ नाही । गुरुकृपेवीण ईश्वरलाभ नाही ।
दोन्ही कृपेवीण स्वरूपप्राप्ती नाही । ते तत्त्व प्रियोत्तमाचे ।।३९।।

प्रियोत्तम विचारतत्त्वी । आहे सद्‌गुरूवरी भक्ती ।
सद्‌गुरु हीच परमशक्ती। हे तत्त्व प्रियोत्तमाचे ।।४०।।

मीच आहे आत्मा । मीच आहे चिदात्मा ।
अंतरी भाव ज्ञानात्मा । हे तत्त्व प्रियोत्तमाचे ।।४१।।

वेद उपनिषद गीता । ही प्रियोत्तमाची मातापिता ।।
आध्यात्मिक ग्रंथांची सिद्धता। हे तत्त्व प्रियोत्तमाचे ।।४२।।

प्रियोत्तम स्वयंसिद्ध । प्रियोत्तम स्वयंप्रकाश ।
प्रियोत्तम सोऽहम् मंत्र । हे तत्त्व प्रियोत्तमाचे ।।४३।।

।। प्रियोत्तम धर्म ।।

स्व-स्वरूपी राहणे हा स्वधर्म । हाच प्रियोत्तमाचा परम धर्म ।
स्वधर्म पालन हेचि सत्कर्म । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।४४।।
स्वरूप सत्‌चित् आनंदघन । या वचनी विश्वास पूर्ण ।
धर्माचरणी निष्ठा पूर्ण । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।४५।।
सगुण आणि निर्गुण । दोन्ही स्वरूपी एकपण ।
अखंड भक्ती करी जाण । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।४६।।
आत्मनात्म विचार करी । सर्वांवरी प्रेम करी ।
आत्मभाव निर्धारी । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।४७।।
प्रेम हाच परमात्मा । आत्मा हाच प्रेमात्मा ।
दोन्ही एकच आत्मा । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।४८।।

प्रेमाची करी उपासना । निर्मळ भावे पवित्रपणा ।
संयमी वृत्ती साधेपणा । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।४९।।
शांतिवरी निष्ठा ज्यांची । अंगी वृत्ती बाणे त्यांची ।
धर्म पालन पूजा हेची । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।५०।।
बह्म हेच आनंद स्वरूप । स्व-स्वरूपी सुख अमूप ।
या सुखाची प्राप्ती स्वरूप । प्रियोत्तम धर्मी आहे ।।५१।।
प्रियोत्तमाचे धर्माचरण । अखंड असे सावधपण ।
निर्विषयपणे मनपूर्ण । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।५२।।
सर्व धर्माचे जे सार । तो प्रियोत्तमाचा विचार ।
चित्सौख्यचा सागर । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।५३।।
ज्ञानस्वरूप आत्म्याचे । असे तत्त्व शास्त्राचे ।
ते स्वरूप प्राप्तीचे । प्रियोत्तम धर्मी असे ।।५४।।

विवेक आणि चिंतन । श्रद्धा संयम पवित्रपण ।
साधे जीवन निरहंकारीपण । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।५५।।
तुझे स्वरूप सच्चिदानंदघन । अंखड करी त्याचे चिंतन ।
चिंतन हेचि प्रमुख साधन । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।५६।।
अखंड घ्याव्या भेटीगाठी । कराव्या तत्त्वाच्या गुजगोष्टी ।
प्रेमभावाची तळमळ पोटी । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।५७।।
अखंडपणे सावधपण । विचार चिंतन आणि मनन ।
हेचि करणे साधन । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।५८।।
स्व-स्वरूपी ठेवा वृत्ती । प्रियोत्तमाची धरा संगती ।
तेणे होईल स्वरूप प्राप्ती । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।५९।।
आत्म्याची नित्य उपासना । भक्तिभावे करी साधना ।
अखंड करितो प्रार्थना । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।६०।।

स्वरूप आपले ज्ञानमय । प्रेम शांती आनंदमय ।
अखंड स्वरूपी तन्मय । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।६१।।
प्रात:काळी उठावे । प्रियोत्तम तत्त्व स्मरावे ।
स्वरूपासी चिंतावे । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।६२।।
सर्व संतांसी वंदावे । सर्व ग्रंथासी पूजावे ।
सर्व धर्मांसी नमावे । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।६३।।
समत्व बुद्धी ही थोर । प्रियोत्तम तत्त्वसार ।
एकनिष्ठ करावा विचार । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।६४।।

।। तो प्रियोत्तम जाणावा ।।

सदा प्रेमळ निर्मळ । स्व-स्वरूपी निश्चळ ।
सोऽहम् जपे सर्वकाळ । तो प्रियोत्तम जाणावा ।।६५।।

विषया विषयी विरक्ती । (देवी) ईश्वरा विषयी भक्ती ।
सर्वांविषयी प्रीती । तो प्रियोत्तम जाणावा ।।६६।।
स्व-स्वरूपी दृढ श्रद्धा । विपत्ती अथवा संपदा ।
सोऽहम् अंतरी सर्वदा । तो प्रियोत्तम जाणावा ।।६७।।
अखंड अभ्यासी लक्ष । कर्तव्यासी असे दक्ष ।
भोगात असे दुर्लक्ष । तो प्रियोत्तम जाणावा ।।६८।।
सर्व सुखाचा सागर । प्रियोत्तमाचा विचार ।
ऐसा जयाचा निर्धार । तो प्रियोम जाणावा ।।६९।।
ऐहिक संपत्ती क्षणिक । त्यांत न वाटे सार्थक ।
ऐसी जयाची वागणूक । तो प्रियोत्तम जाणावा ।।७०।।
स्वरूप प्राप्तीची प्रीती । भोग संपत्ती विरक्ती।
सर्वाविषयी अनासक्ती । तो प्रियोत्तम जाणावा ।।७१।।

ईश्वरवादी विचार । असे अंतरी प्रेम पाझर ।
तैसाच राहे सदाचार । तो प्रियोत्तम जाणावा ।।७२।।
देह आहे हे साधन । त्याचे करावे संगोपन ।
स्वरूपाचे असावे स्मरण । तो प्रियोत्तम जाणावा ।।७३।।
सुस्वभाव सद्‌गुण । सद्‌गुण विकास आणि ज्ञान ।
सुशीलपण हे भूषण । तो प्रियोत्तम जाणावा ।।७४।।
नरनारी अवघे जन । सर्वा ठायी एकपण ।
समत्व बुद्धीने दर्शन । तो प्रियोत्तम जाणावा ।।७५।।
अवघे जन प्रेमरूप । तेच आहे ब्रह्मरूप ।
ऐसी वृत्ती आत्मरूप । तो प्रियोत्तम जाणावा ।।७६।।
नम्रभावे सर्वा ठायी । विचार सांगे प्रेमापायी ।
मानवतेची श्रद्धा ठेवी । तो प्रियोत्तम जाणावा ।।७७।।

पूजा करी मानवतेची । प्रेमळ कृती सौख्याची ।
नीति न्याय निष्ठेची । तो प्रियोत्तम जाणावा ।।७८।।

अंत:करणी तळमळतो । प्रियोत्तम विचार सांगतो ।
सर्वत्र प्रचार करितो । तो प्रियोत्तम जाणावा ।।७९।।

साधी राहणी सरळ करणी । मन निर्मळ. प्रेमळ वाणी ।
वागे फिरे सहज मनधरणी। तो प्रियोत्तम जाणावा ।।८०।।

एकांती स्वरूपी असे । अंतरी प्रसन्नता वसे ।
निर्विषय मन असे । तो प्रियोत्तम जाणावा ।।८१।।

आप्त जन इष्टमित्र । या सर्वांचे असे सूत्र ।
आत्मप्रेमाचे गोत्र । तो प्रियोत्तम जाणावा ।।८२।।

घरी दारी बाहेरी । सर्वा ठायी सर्वांतरी ।
वागतसे प्रेमभरी । तो प्रियोत्तम जाणावा ।।८३।।

मी व तू पण विसरे । एकत्वाची कृती करे ।
सर्वांविषयी प्रेम भरे । तो प्रियोत्तम जाणावा ।।८४।।
स्वभाव कृती गोड । सत्‌विचाराची जोड ।
प्रसन्नता अंतरी गोड । तो प्रियोत्तम जाणावा ।।८५।।
सुस्वभावी सद्विचारी। शांत निर्मळ प्रेमभरी ।
सदा सर्वदा प्रेमभरी । तो प्रियोत्तम जाणावा ।।८६।।
साधनी असतो तत्पर । व्यवहार करी नीतिपर ।
सांभाळितो लोकाचार । तो प्रियोत्तम जाणावा ।।८७।।
दैवी संपत्तीयुक्त जाण । ज्ञान लक्षण भक्ती प्रमाण ।
प्रज्ञा आणि प्रतिभा पूर्ण । तो प्रियोत्तम जाणावा ।।८८।।
लोकसंग्रहाची आवडी । प्रेमभावे मैत्री जोडी ।
सत्संग संतांची गोडी । तो प्रियोत्तम जाणावा ।।८९।।

साधे घर बागेमध्ये । गवता तट्ट्याच्या झोपड्या बांधे ।
साधेसुधे फळ्या कावडे । प्रियोत्तमाचे ते घर ॥९०॥
असंग्रही अपरिग्रह वृत्ती । निःस्पृह निर्लोभ प्रवृत्ती ।
साधी सरळपणाची प्रीती । तो प्रियोत्तम जाणावा ॥९१॥
शुभ्ररंगी साधे वस्त्र । वृत्ती तयाची असे पवित्र।
संयमी वागे सदा सर्वत्र । तो प्रियोत्तम जाणावा ॥९२॥
सोंग ढोंग दंभ नाही। बुवाबाजी नाही काही ।
चार चौघासारखे राही । तो प्रियोत्तम जाणावा ॥९३॥
विचारी चिंतनी राहतो । परी कांही कळू न देतो ।
सहज व्यवहार सर्व करितो । तो प्रियोत्तम जाणावा ॥९४॥
स्व-स्वरूपी संतुष्ट असतो। व्यवहारी प्रेमळपणा दिसतो ।
समाजात नम्रपणे वागतो । तो प्रियोत्तम जाणावा ॥९५॥

।। महती ।।

प्रियोत्तम अनादि सिद्धतत्त्व । हे जाणावे त्याचे महत्त्व ।
प्रियोत्तम धर्मतत्त्वाचे हेची सत्त्व । अंगी असावे तपयुक्त ।।९६।।
प्रियोत्तम विचार सरणी । ही सारी परब्रह्माची करणी ।
म्हणूनि तुम्हा करितो विनवणी । प्रियोत्तम सत्त्वर व्हावे ।।९७।।
सावरगाव पुण्य पवित्र । तेथे नांदते प्रियोत्तम तत्त्व ।
अनादि जे महत्‌तत्त्व । अवतरले असे ।।९८।।
तत्त्वचिंतकाचे सावरग्राम । तिथे स्थापिला प्रियोत्तमाश्रम ।
तत्त्वचिंतन करी नित्य नेम । प्रगटला प्रियोत्तम विचार ।।९९।।
वा.कि. तत्त्वचिंतक । प्रियोत्तम विचार दर्शक ।
आत्मविचार प्रवर्तक । स्वयंस्फूर्तीने लिहिले ।।१००।।

ही स्फूर्ती श्री जगदंबेची । कृपा आहे सद्गुरुची ।
प्रतिभा प्रज्ञा परब्रह्माची । निमित्तमात्र मी असे ।।१०१।।
जो अभ्यासील विचार प्रियोत्तमाचे । तो सुख पावेल अखंड साचे।
स्वरूप पावेल तो आत्मरूपाचे । जे रूप असे स्वरूपी ।।१०२।।
प्रियोत्तम तत्त्व अमर असो । विजयी यश किर्तिमान असो ।
सर्वांच्या अंतरी अखंड वसो । ही प्रार्थना श्रीजगदंबेला ।।१०३।।

ॐ

श्री जगदंबेने सुचविले । श्री गुरकृपेने लिहिले ।
प्रियोत्तम तत्त्व अवतरले । अमर झाले भूमंडळी ।।
हा ज्ञानयज्ञाचा प्रसाद । भक्तिभावे घ्यावा स्वाद ।
विचार मनन करी निर्विवाद । स्व-स्वरूपी पावेल तो ।।

ॐ सोऽहम् आनंद

।। प्रियोत्तम साधन सिद्धी ।।

निःसंदेह असावे साधनी । तेणे होतसे आत्मज्ञानी ।
ऐसा विश्वास अंतःकरणी । भक्तिभावे धरावा ।
नित्यनेमे दीपपूजन । अखंड करी सोऽहम् स्मरण।
प्रियोत्तम ग्रंथ पारायण । भक्तिभावे करावे ।।

– प्रियोत्तमानंद

करिता आधी चित्तशुद्धी । मग आँपैसी होय भाववृद्धी ।
जेणे पावे ज्ञानसिद्धी । स्वस्वरूपाची ।।१।।
स्व–स्वरूप पावावया । शरण रिघावे सद्गुरु राया ।
मग होय ब्रह्मरूप काया । अंतर्बाह्य रूप जे ।।२।।
ईश्वर सद्गुरुरूसी भजावे । अनन्यभावे शरण जावे ।
सदा सर्वदा तत्पर असावे । त्यांचे चरणी ।।३।।

प्रियोत्तमानंदाचे मातापिता । तया लाभली खरी धन्यता ।
प्रियोत्तम तत्त्वज्ञानाची वंशलता । त्यांच्या कुशीतूनि प्रसवली ।।४।।

"श्री वाणी"

ॐ सोऽहम्

।। सद्विचार ।।

सद्विचार जयासी लाभला । तोचि जगी धन्य झाला ।
विचारेविण व्यर्थ गेला । मानव जन्म ।।१।।

विचारे विचार करावा । विचार अंतरी धरावा ।
धरूनि संसार तरावा । विचारयोगे ।।२।।

विचारे सर्व लाभले । विचारे सर्व सुखावले ।
विचारे सर्व पावले । पूर्णत्वासी ।।३।।

पूर्णतेचा महा घाट । चढे जरी कुणी सुभट ।
तेणे धरावा विचार श्रेष्ठ । अध्यातमाचा ।।४।।

अध्यात्म विचाराविण । ते तू सारे व्यर्थ जाण ।
विचार करिता श्रेष्ठपण । अंगी बाणे ।।५।।
विचारी तेचि देव झाले । विचारी तेचि ऋषी झाले ।
विचारी तोचि संत झाले । विचाराने ।।६।।
विचारी तोचि समाधानी । विचारी तोचि आत्मज्ञानी ।
विचारी पावती सौख्यखाणी । विचाराने ।।७।।
अंतर्मुख ठेऊनि वृत्ति । देहभावाची करी निवृत्ती ।
आत्मभावे सदा वर्तती । सुसंस्कारे ।।८।।
जया अंगी देहभावाचे वारे । तया न ठसे बोध बरे ।
वाटे तयासी भोगचि खरे । ते न होती विचारी पै ।।९।।
शमदमादि साधनी राहती । सुसंस्काराची धरूनि संगती ।
सदा चिंतन मनन करिती । ईशस्वरूपाचे ।।१०।।

भगद्भजनी जे लागले । सर्वभावे जे शरण आले ।
अनन्यभावे भक्तीस लागले । ते विचारी ।।११।।
देहभाव गळूनि गेला । विचारे आत्मभाव वाढला ।
अंतरी बोध ठसला । विचार करिता ।।१२।।
एकांती स्थिर बैसावे । बैसोनि स्व-स्वरुपा शोधावे ।
शोधिता शोधिता ओळखावे । निजरुपासी ।।१३।।
विचार हा अति गहन । सुक्ष्माहूनि सुक्ष्म जाण ।
त्याची असे हीच खूण । आत्मरुपी रंग तो ।।१४।।
सर्व काही करित रहावे । परी विचाराते न सोडावे ।
विचारभावाने ते जोडावे । आपुल्या कृतीसी ।।१५।।
विचाराची राज़ खूण । सोऽहम् हंसचे रूप जाण ।
हेचि मोक्षाचे लक्षण । हंसरूपे ।।१६।।

दूध पाणी जो घेतो निवडून । ती हंसाची राज खूण ।
तैसा विचारी घेतो निवडून । देह आणि आत्मा ।।१७।।
देह आत्मा अचूक ओळखणे । तयासचि सुविचार म्हणणे ।
विचाराचा महिमा जाणणे । हा प्रियोत्तम धर्म ।।१८।।

।। सदाचार ।।

सद्विचार अंगी बाणला । तोचि सदाचारी झाला ।
सदाचारी पूर्णत्वाला । सहजपणे पावतो ।।१९।।
विचार मागे वदविले । तेचि प्रयत्ने वळविले ।
वळवूनि पुन्हा जाणविले । तो सदाचारी ।।२०।।
सदाचारी परम मुक्त । सदा सर्वदा तो युक्त ।
वागे फिरे संयुक्तिक । आपुल्या ठायी ।।२१।।
आपण आपुल्या ठायी । जन्म मृत्यूत तो न येई ।
स्व-स्वरुपा पायी । तो लागला ।।२२।।

स्व-स्वरुपी तो आनंदी । तयाचे चित्त ब्रह्मानंदी ।
वृत्ती लागली परमानंदी । सदाचाराने ।।२३।।
ज्ञान-भक्तीचा योग साधुनी । जेणे अनुभविला सोऽहम् ध्वनी ।
गुरुकृपे झाला आत्मज्ञानी । पूर्ण बोधे ।।२४।।
ईश्वर कृपा लाभली । देहभावाची वृत्ती नुरली ।
जीव-शिवाची ऐक्यता झाली । निसंशयपणे ।।२५।।
जेथे जातो तेथे सुखवितो । जेथे राहतो तेथे हसवितो ।
जेथे जेथे जातो राहतो । तेथे तेथे आनंद ।।२६।।
देहभावाचे जे जडले गुण । ते काढावे समूळ खणून ।
अंतरी जे राहती सद्गुण । ते घ्यावे ।।२७।।
विचार आचार स्वभाव । ज्यांच्या हाती एकमेव ।
तोच सद्गुणाची ठेव । निजगुणी ।।२८।।

जो ऊर्मीतूनि गेला । स्फुरणाच्या अंतरी लागला ।
तोचि खरा सद्‌गुणी झाला । अंतर्यामी ।।२९।।
अंतर्यामी चित्तशुध्दी । होता झाली भाववृध्दी ।
तेथेचि झाली ज्ञानसिध्दी । सद्‌गुणापायी ।।३०।।
विचार आचार भावशील । तोचि जाणावा सुशील ।
सुशील तोचि कुलशील । कुलदीपक जो ।।३१।।
सुशील तेचि भले । तेचि जगी धन्य झाले ।
सर्वतोपरी श्रेष्ठ ठरले । सुशीलपणे ।।३२।।
अनेकांसी संतोषविले । सर्वांसी साह्य दिले ।
परोपकारी ते लागले । निरपेक्षपणे ।।३३।।
मर्यादा आचार वर्तणुकीचा । आचार विचार धर्माचा ।
शांत मित भाषणाचा । पुतळा असे ।।३४।।

लोकांचे अवगुण न वदतो । सद्गुण प्रेमभावे सांगतो ।
संत सज्जनांसी नम्रत्वे वागतो । आपुलेपणे ।।३५।।
मौन धरी कठोर वचनी । कुविचार तो नये मनी ।
गुप्तपणे परोपकार करुनी । निरहंकारी असे ।।३६।।
सुशीलपण अति चांगले । जे आचरण करिती भले ।
तेचि पैलथडी लागले । जन्मा येऊनी ।।३७।।

।। सरळपणा ।।

दैवी गुणाचे लक्षण । ज्यांचे अंगी सरळपण ।
सरळपणे ज्यांचे जीवन । तेचि धन्य ।।३८।।
संशय शंका कांही नाही । आत बाहेर नाही कांही ।
बोलणे चालणे एकच राही । ते सरळपण ।।३९।।

मत्सर धरून नच वागतो । स्वार्थी कपटी नच असतो ।
किल्मिष कांही न ठेवितो । आपुले मनी ।।४०।।
जे जयाच्या ध्यानी मनी । तेचि तयाच्या असे वचनी ।
वचनी तेचि आचरणी । ते सरळपण ।।४१।।
सरळपणी जे वागले । ते खरे कृतार्थ ठरले ।
अंतर्यामी सुखी झाले । सरळपणे ।।४२।।

।। संयम ।।

सर्व धर्माचा आधार । तोच खरा संयमाचार ।
संयमी तोच योगेश्वर । प्रियोत्तमयोगाचा ।।४३।।
जयासी संयम नाही । त्याचे लक्षण बरे नाही ।
यथार्थ कृतार्थ होत नाही । संयमाविण ।।४४।।
संयमे जे वागले । तेच योगी योगेश्वर झाले ।
धर्माच्या ठायी आरूढले । सहजपणे ।।४५।।

संयम म्हणजे इंद्रिय दमन । इंद्रिय मनाचे एकपण ।
बुध्दीच्याही सर्व अधीन । आत्म्याठायी ।।४६।।

।। साधेपणा ।।

भोगपण विसरूनि जाणे । तया साधेपण म्हणणे ।
सर्व भोग समर्पण करणे । ईश्वरा ठायी ।।४७।।
आपण आपणा विसरावे । स्वभावेच लहानपण घ्यावे ।
अहम् निःशेष सांडावे । सहजपणे ।।४८।।
सहज आचार असावा । त्याचा कांही अहम् नसावा ।
विद्वत्ता धनाभिमान सांडावा । आपुल्यापणे ।।४९।।
अंगी भूषण नच संपत्तीचे । नावडे अलंकार साचे ।
बोलणे चालणे मृदुपणाचे । सहजपणे ।।५०।।

लीनतेने व्यवहार करितो । गोड राहून सहज वागतो ।
पाहूनीहि तो न वाटतो । हा कुणी विशेष ।।५१।।
ज्याचे घर साधे सुधे । संग्रही कांहीच न घे ।
स्वभावेचि बोले बोधे । सुमधुर वचने ।।५२।।
आहार विहार सात्त्विक । वृत्ती सदा असे भाविक ।
काळ न घालवी निरर्थक । आयुष्याचा ।।५३।।

।। शुचिर्भूत ।।

अंतर्बाह्य असे निर्मळ । जैसे का ते गंगाजळ ।
ईश्वरा ठायी जो निश्चळ । तो शुचिर्भूत ।।५४।।
पाप वासना न राखे मनी । देह पवित्र सदा ठेवुनी ।
शुध्द सात्त्विक ज्याची करणी । तो शुचिर्भूत ।।५५।।

शुध्द शुभ्र वस्त्रे ल्यातो । साधे सहजपणे राहतो ।
शुध्द सात्त्विकान्न सेवितो । स्वधर्मे पर्णकुटीत ।।५६।।
प्रात:काळीच तो उठतो । जप तप ध्यानादिकी राहतो ।
आत्मानात्म विचार करितो । आपुल्या ठायी ।।५७।।
साधन साध्य विचार । हाच मानवाचा आचार ।
साधन करिता साक्षात्कार । साध्याचा होतसे ।।५८।।
अखंड साधनी तत्पर । ईश्वर भजनी निरंतर ।
शमदमादि साधनी सादर । स्वाध्याय सावधपणे ।।५९।।
श्रध्दाभावे साधन करी । यथासांग कर्म आचरी ।
नम्रभावे सेवा करी । संत सद्गुरुची ।।६०।।
अनन्यभावे भजनशील । सर्वाभूती अतिप्रेमळ ।
अंतरी राहे तळमळ । ईश्वर प्राप्तीची ।।६१।।

साधन मार्ग न विसंबे । कुतर्क कुसंगती न थांबे ।
विकार वासनेसी झोंबे । नामस्मरण करूनी ।।६२।।
निःसंदेह झाला जो मनी । तो स्व-स्वरुपाच्या लागला ध्यानी ।
विवेक वैराग्याची लावली धुनी । निःसंगपणे ।।६३।।
ज्याची देहभाववृत्ती निमाली । हृदयी ईश्वरमूर्ती बिंबली ।
अष्टभाव जागृती झाली । ईश्वर भजनी ।।६४।।
जेथे जेथे आत्मभाव । अंतरी राहे सोऽहम् भाव ।
शांत प्रसन्न ज्याचा स्वभाव । स्वाध्याय सहजपणे ।।६५।।
परोक्षज्ञानी पूर्ण झाला । अपरोक्ष अनुभूती भाव चढला ।
अंतर्बाह्य प्रकाश पडला । आत्मज्ञानाचा ।।६६।।
साधक राहे व्रतधारी । सर्वाभूती नमस्कारी ।
अखंड राहे निर्विकारी । आपुल्या ठायी ।।६७।।

निवर जो सर्वाभूती । लाभावीण करी प्रीती ।
न्याय नीतीच्या सर्व रीती । यथासांग पाळीतसे ।।६८।।

यथासांग शास्त्र वचन । अंगी बाणले ते जाण ।
धर्मानुसार आचरण । अखंड अनुसंधान स्वरुपाचे ।।६९।।

साधक सर्वातूनि सुटला । परमार्थी तो तसाचि जुटला ।
संशय सर्वतोपरी फिटला । धर्मशास्त्र साधनेने ।।७०।।

नित्य एकांती बैसावे । स्व-स्वरुप चिंतन करावे ।
संसारी अलिप्त रहावे । साधकांनी ।।७१।।

साधनेची करावया सिध्दी । लावू नये जीवासि उपाधी ।
सदा सर्वदा असावी बुध्दी । आत्म्याठायी ।।७२।।

नित्यनेमे नामस्मरण । नीतिन्याये व्यवहारी निपुण ।
अखंड असे पवित्राचरण । साधकाचे ।।७३।।

आळस औदासिन्य घालवी । सत्कर्मी जीव ठेवी ।
देवतार्चनादी कर्मे चालवी । भक्तिभावे ।।७४।।
व्रत नियमे देहे आचरी । नामघोष वाचे उच्चारी ।
भक्तिभावे मार्ग धरी । परमार्थाचा ।।७५।।
रात्रंदिन परमार्थ विचार । संसारीही तैसाचि तत्पर ।
अतिथी अभ्यागत सत्कार । प्रेमभावे करितसे ।।७६।।
उत्तम मार्गे धन मेळवी । मेळवूनि सत्कार्यी ते लावी ।
इतरा करवी हि तेचि घडवी । निरपेक्षपणे ।।७७।।
सौम्य मुद्रा मधुर वाणी । पवित्रता सदा आचरणी ।
सत्त्वगुणयुक्त त्याची करणी । अखंडपणे ।।७८।।
स्वच्छ साधे ज्यांचे सदन । प्रफुल्ल सदा त्यांचे वदन ।
बोले सदा मृदू वचन । सर्वत्रासी ।।७९।।

चालता बोलता परमार्थ । शास्त्रार्थ सांगे यथार्थ ।
वाद विवाद बंड व्यर्थ । कधी न करी ।।८०।।
व्यर्थ चर्चा खंडण मंडण । चित्ताचे करणे उगीच हनन ।
त्यातूनि लाभे असमाधान । व्यर्थ वादाने ।।८१।।
मौनी मौनत्वे सदा असतो । योग्य असता ते सांगतो ।
भावेविण नच बोलतो । परमार्थ साधना ।।८२।।
जगी जनी व्यवहारी प्रेमळ । नामघोष सर्व काळ ।
भक्तिभावे करूनि चित्त निर्मळ । स्वरुपाकार होतसे ।।८३।।
मानव जन्माचे सार्थक । करावे वाटे आस्थापूर्वक ।
यथा शास्त्र त्याची वर्तणूक । नित्य असे ।।८४।।
आहारशुध्दी बुध्दिशुध्दी । भावशुध्दी सुखवृध्दी ।
मग पावते परमसिध्दी । साधनेने ।।८५।।

भक्तिज्ञानाची करूनि युतो । प्रियोत्तम धरिला ज्यांनी चित्ती ।
स्वरूप प्राप्तीची अपारप्रीती । त्यांच्या ठायी जडलीसे ।।८६।।
साधक निर्भय निर्मम असतो । सदा सर्वदा तत्पर राहतो ।
सदाकदा प्रसन्नचित्त दिसतो । अपार श्रध्देने ।।८७।।
जेथे जेथे सत्कर्म घडती । तेथे ठेवी आपुली उपस्थिती ।
जनसंग्रहाची धरूनि प्रीती । सत्संग धरी ।।८८।।
ज्ञानलक्षण मुरवी चित्ती । अंगी बाणवी दैवी संपत्ती ।
अभ्यासे वाढवी वैराग्य वृत्ती । स्वाध्याय करी अध्यात्माचा ।।८९।।
संत सहवासाची आवड त्यास । सत्ग्रंथांचा करी अभ्यास ।
सगुणस्वरुपाचा मनी ध्यास । सदा ठेवी ।।९०।।
अंतर्मुख होऊनी सदा राही । सावधान वृत्तीने अखंड पाही ।
श्रध्दा संयमी विश्वास राही । आपलेपणे ।।९१।।

सद्गुणांची करूनि वाढ । परमार्थाचा चढतो गड ।
कूटस्थांची धरून आवड । ईश्वर कृपा संपादितो ।।९२।।
सद्गुरू ठायी करूनि भक्ती । परमार्थाची वाढवी शक्ती ।
गुजगुह्याची करूनि प्राप्ती । होय यशवंत ।।९३।।
सद्गुरू आणि देवासी शरण । सदा सर्वदा असे अनन्य ।
सर्व भाव समर्पण । पराभक्तीसी लागला ।।९४।।
आत्मानात्म विचार करूनी । आत्मस्वरूप धरिले मनी ।
देहभाव विसर्जन करूनी । परमार्थी चढू लागला ।।९५।।
सहज साधना अंगवळणी । कधी न वाटे कंटाळवाणी ।
उल्हासोत्साहरूप । त्याची करणी साधन सिध्दीची ।।९६।।
नवविधा करूनि भक्ती । नामस्मरणाची मंगल शक्ती ।
तेणे होय सगुण प्राप्ती । हे त्रिवार सत्य जाणा ।।९७।।

साधकाचो यशस्वी साधना । अखंड स्फुरे त्याची भावना ।
सदा सर्वदा त्याची अर्चना । ईश्वरा ठायी ।।९८।।

सख्यत्व सन्मैत्री ठेवितो । सत्संगे सुपंथ दावितो ।
प्रियोत्तमकार्या वाहुनि घेतो । दैवी कार्य म्हणूनी ।।९९।।

साधकासी सन्मार्ग । दावितो तो कूटस्थ वर्ग ।
आत्मज्ञानाचे सखोल वर्म । भाव संचार दावी ।।१००।।

साधनेची करूनि सिध्दी । सिध्दत्वाची लाभली वृध्दी ।
आत्मनिष्ठ झाली बुध्दी । अंतर्बाह्य प्रकाशला ।।१०१।।

।। ॐ आनंद आनंद आनंद।।

साधकांनो मार्ग धरा । प्रियोत्तमयोग स्वीकारा ।
भक्तिभावे तो आचरा । प्रियोत्तम ग्रंथाने ।।१।।

प्रियोत्तम ग्रंथाने ग्रंथी तुटती । देहभावाची फिटे भ्रांती ।
जीव शिवाची भेटी होती । मूळचे एक ते ।।२।।

शुभ्र वस्त्र नेसून । कुंकमे दीप पूजन ।
"दिपज्योती" श्लोक म्हणून । आसनी बैसावे ।।३।।

"आत्मपूजा" प्रात:काळी । 'सिध्दबोध' ग्रंथ मध्यान्हकाली ।
'तत्त्वज्ञान' सायंकाळी । नित्य वाचावे ।।४।।

ग्रंथांचे पारायण करावे । कर्मकांड न मानावे ।
अंतरी भाव जागावे । हा हेतू ।।५।।

चिंतन मनन करावे । अभ्यासे ते अनुभवावे ।
ब्रह्मानंदी डोलावे । साधक सिध्द होतो ।।६।।

प्रियोत्तमानंदाचे शेजारी । पीठास्वामीनी देव्हारी ।
शिव-शक्ती अवतारी । जाणावे ।।७।।
सर्वश्रेष्ठ गुरू जाणा । अनुभव प्रमाण माना ।
दृढविश्वासे लाभती खुणा । ब्रह्मज्ञान प्राप्ती ।।८।।
ते होतील महाधिकारी । जे प्रियोत्तमावर भाव धरी ।
ज्ञानयज्ञ सोहळे करी । निरपेक्ष दानाने ।।९।।
सिध्दबोध क्षेत्री सोहळे । भक्त गणांचे तेथे मेळे ।
ज्ञानयज्ञाचा प्रसाद मिळे । दैवीशक्ती वाणीचा ।।१०।।
दैवीशक्तीची महत्करणी । जेथूनि प्रगटते संचारवाणी ।
ती अपार अमोल रत्नखाणी । अध्यात्म ज्ञानाची ।।११।।

।। अंतरीचा सोऽहम् भाव।।

अंतरीचा सोऽहम् भाव । भावाने भाव अनुभवावा ।
त्याने भावानंद सुखे पावाल । तो मी आत्मा चिंतीत रहावा ।।

ॐ सोऽहम्

ॐ सोऽहम् श्रीम् सोऽहम् । तत्त्वं सोऽहम् सः सोऽहम् ।
सोऽहम् हंसः हंसः सोऽहम् । ॐ तत्त्व सोऽहम् सः ।।१।।
देहो देवालयः प्रोक्तः । सजीवः केवलं शिवः ।
त्यजेदज्ञान निर्माल्यम् । सोऽहम् भावेन पूजयेत् ।।२।।
प्रथमा प्रतिमा पूजा । जपस्तोत्राणि मध्यमा ।
उत्तमा मानसी पूजा । सोऽहम् पूजोत्तमोत्तमा ।।३।।
सोऽहम् भावे रात्रंदिन । तेथे ठेविता अनुसंधान ।
देव देवता होऊनि प्रसन्न । देती वरदान साधकाते ।।४।।

ॐ सोऽहम्

।। परंपरा महिमा ।।

शिव शिव महादेव । देवी देव देवाधिदेव ।
सर्वजण पूजिती सोऽहम् भाव । भावानंदाने ।।१।।
वेद श्रुति स्मृति । सर्व संत साहित्यी ।
ज्ञानी तत्त्वज्ञ गाती । सोऽहम् सोऽहम् ।।२।।
ॐ सोऽहम् बीजनाम मंत्र । जपत आले महाभक्त ।
सर्वचि झाले कृतार्थ । सोऽहम् भावे ।।३।।

।। शिवभक्तिसिध्दसंबोध ।।

सोऽहम् दावितो रूप । सुख देतो अमूप ।
लावितो ज्ञानदीप । स्वरुपाचा ।।१।।

सोऽहम् म्हणजे अनन्यता । सोऽहम् म्हणजे शरणागता ।
सोऽहम् म्हणजे एकता । जिवा शिवाची ।।२।।
सोऽहम् ते सर्वभावे । सोऽहम् ते प्रेमभावे ।
सोऽहम् ते एकभावे । आत्मरुपे ।।३।।
सोऽहम् स्वरूप दावी । देहभाव जो घालवी ।
जिवाशिवाचे ऐक्य दावी । ते सोऽहम् ।।४।।
स्वरूपाची जी ओळखण । सोऽहम् देतो ती खूण ।
जीवदशेचे भ्रमण । सोऽहम् घालवी ।। ५।।
जीव शिवाचे भेदपण । तेणे होते जे अज्ञान ।
अज्ञानापायी जनन मरण । सोऽहम् घालवी ।।६।।
सोऽहम् अनादि सिध्द जप । अंतरी होतो जो आपोआप ।
त्यावरी लक्ष ठेवुनि प्रेमरूप । सिध्द व्हावे तुम्ही ।।७।।

सोऽहम् भाव योग अपार । त्याचा महिमा अपरंपार ।
सर्व शास्त्र सिध्द थोर । सर्वां ठायी बोलिला ।।८।।
तुम्हाला दिला जो क्षीरसागरी । तोचि चालत आला आजवरी ।
जो धरिला आज प्रियोत्तमावतारी । हाचि सोऽहम् ।।९।।
सोऽहम् जया लाभला । तो सर्वार्थी श्रेष्ठ ठरला ।
परमपदी अमर झाला । सोऽहम् भावे ।।१०।।
या भूमी प्रगटला प्रियोत्तम। सार्थकी लावितो मनावजन्म ।
नो पावतो तो पुर्नजन्म । सोऽहम् योगे ।।११।।
सर्व योग योगी जनांनी । सोऽहम् जपावा भाव ठेऊनी ।
तेव्हाच सुटतील बंधातुनी । अहंममतेच्या ।।१२।।
बंध मोक्षाचे कारण । अहंममताचि तू जाण ।
त्यातून मुक्तपण । सोऽहम् ने होय ।।१३।।

सोऽहम् जपत रहावे । साक्षीत्वाने पहात रहावे ।
तटस्थपणे वागत रहावे । निर्लेपपणे ।।१४।।
सः म्हणजे शिवात्मा । अहं म्हणजे जीवात्मा ।
दोन्ही स्वरूप एकता । ॐ ब्रह्मरुपे ।।१५।।
जिवाशिवाचे भेदपण । हे अज्ञानाचे लक्षण ।
सोऽहम् घालवितो ते जाण । जे मूळीचे एकतत्वी ।।१६।।
सोऽहम् मंत्र जप सर्वांचा । अंतरी भाव असावा साचा ।
असा संदेश प्रेमाचा । प्रियोत्तम भक्तासी ।।१७।।
याति जाती काही नाही । नरनारी भेद नाही ।
सोऽहम् सोऽहम् म्हणत राही । कृतार्थता पावाल ।।१८।।
सर्वा ठायी सर्व योनी । सोऽहम् चालतो अखंड ध्वनी ।
श्रवणों ध्वनी अंतरातुनी । ध्यान योगे ।।१९।।

अहं कोऽहम म्हणत राहिला । त्यातून सोऽहम् कळला ।
सोऽहम्ने स्वरूपी आला । मूळ तत्ताच्या ।।२०।।
आपुले स्वरूप जेव्हा कळले । तेव्हाचि जीवपण गेले ।
शिवपण अंगी आले । सोऽहम् ब्रह्मभावे ।।२१।।

।। स्वधर्म ।।

स्वरूप लाभ हा स्वधर्म । सोऽहम् स्वधर्माचे सत्यवर्म ।
प्राप्त व्हावया धरा भावमार्ग । प्रियोत्तमयोगे ।।२२।।

।। सदाचार ।।

ज्ञान भक्तीचा योग साधूनी । ज्यांनी अनुभविला सोऽहम् ध्वनी ।
गुरुकृपे झाला आत्मज्ञानी । पूर्ण बोधे ।।२३।।

॥ साधक ॥

जेथे तेथे आत्मभाव । अंतरी राहे सोऽहम् भाव ।
शांत प्रसन्न ज्यांचा स्वभाव । स्वाध्याय सहजपणे ॥२४॥

॥ संलग्न ॥

सोऽहम् भावी जो संलग्न । स्वरूपाठायी तो मग्न ।
तुटले सर्व प्रकारचे बंधन । परमानंदी रंगला ॥२५॥

अहम् हे जीव पण । सः ते शिव पण ।
अहम् सः चे एकपण । ते ॐ असे ॥२६॥

ॐ सत्य केवळ रूप । अहम् हे जीवरूप ।
सः हे शिवरूप । सर्व एकरूप पहावे ॥२७॥

सोऽहम् भाव ज्यासी कळतो । तो भावरूपचि राहतो ।
भावानंदी स्थिर असतो । भावसमाधीत ॥२८॥

सोऽहम् योगी योगाने जाणतो । ध्वनी सोऽहम् अंतरी करितो ।
ज्ञानी भावविचारे अनुभवितो । सोऽहम् स्वरूप ।।२९।।
परमभावमार्गी प्रियोत्तम । सोऽहम् भाव धरिला उत्तम ।
त्या भावे पावाल पुरुषोत्तम । परम पुरुष तो ।।३०।।
सोऽहम् भावाची संलग्नता । जया लाभली तत्त्वता ।
तो सहजचि स्वरूपता । असतो नित्य ।।३१।।
सोऽहम् भाव ज्यासी कळतो । त्यासी अंतरी प्रकाश लाभतो ।
प्रकाश लाभता स्थिर होतो । सोऽहम् भावी ।।३२।।

।। स्व-स्वरूप।।

स्व-स्वरूपाचा शोध घ्यावा । विचार अंतरी तुम्ही ठेवा ।
आत्मानात्म विचार करता लागे ठावा। सोऽहम् योगे स्वरूपाचा ।।३३।।

|| संपन्नता ||

संत सज्जन घरी येती । रात्रंदिन ब्रह्मज्ञान देती ।
सोऽहम् स्मरणचा ध्वनि एकविती । ती संपन्नता ।।३४।।
प्रियोत्तम परमज्योतिचे पूजन । सर्वत्र मिळुनी करिती दर्शन ।
एकमेकां देती आलिंगन । सोऽहम् भाव सख्यत्वे ।।३५।।
सिद्धतेची चाड धरावी । प्रयत्ने जीवदशा सोडावी ।
जन्ममरणाची व्यथा तोडावी । सिद्धतेने ।।३६।।
जीवदशा संपावया । सिद्धांतस्थिती पावावया ।
आपण आपणासी पहावया । सोऽहम् सिद्धता धरावी ।।३७।।

।। सिद्धबोध ।।

हृदयी एक भाव धरा । सोऽहम् भावे निश्चय करा ।
भावभक्तिमार्ग स्वीकारा । अनन्यत्वे ।।३८।।

अध्यात्म सिध्दांताचे वचन । त्याचे करावे नित्य श्रवण ।
भक्तिभावे सोऽहम् स्मरून । स्वरूप जाणावे ।।३९।।

सर्व काही विसरावे । एकचि सोऽहम् स्मरावे ।
भक्तिभावे मनी धरावे । सिध्दबोध ।।४०।।

परमज्योतिचे नित्य पूजन । सोऽहम् भावाचे अखंड स्मरण ।
प्रियोत्तम तत्त्वविचाराचे पारायण । नित्य नित्य करावे ।।४१।।

सोऽहम् सोऽहम् अखंड स्मरा । भक्तिभावे कार्य करा ।
नित्यनेमे विचार करा। तत्त्वाचा आत्मानात्म ।।४२।।

ॐ सोऽहम् भावरूपो । अखंड असावे स्व-स्वरूपी ।
नित्यनेमे नाम जपी । ॐ सोऽहम् ।।४३।।

ॐ सोऽहम् म्हणत रहा । अखंड चिंतन करीत रहा ।
ब्रह्मभाव ठेवीत रहा । मी आत्मा म्हणूनी ।।४४।।

मंगल वाणी मुखी असो । हृदयी आत्माराम वसो ।
अखंड सोऽहम् भाव असो । निजांतरी मानवा ।।४५।।

अखंड असावे साधन । आत्म्याचे करावे चिंतन ।
स्व-स्वरूपाचे घ्यावे दर्शन । ॐ सोऽहम् गुरुरुपे ।।४६।।

आपण आपणासी पहावे । ब्रह्मरुपी चित्त ठेवावे ।
ध्यानी मनी रुप पहावे । ॐ सोऽहम् सगुण नाम ।।४७।।

अंतरी ब्रह्मभाव असता । प्राणी तेचि रुप पहाता ।
वस्तुतः आत्मभाव ठेविता । ॐ सोऽहम ब्रह्मभाव ।।४८।।
सहजचि शांत असावे । मनी मंगल भाव ठेवावे ।
सदा सर्वदा प्रेम भावे । वर्तावे सोऽहमने ।।४९।।
आपुला जन्म कोठूनि आला । स्वतः पहावे स्वतःला ।
अंतरी पाहता विचार आला । सर्वचित सोऽहम ।।५०।।
सर्वाठायी ब्रह्म पहावे । एकरुप म्हणोनि भाव ठेवावे ।
जे रुप आहे ते आत्मभावे । त्यासी म्हणती सोऽहम ।।५१।।
मूळ स्वरुपतत्त्व एक । पाहता पाहता दिसे अनेक ।
अनेकात पाहता असे एक । मूळ आत्मतत्त्व सोऽहम ।।५२।।
श्रीगुरुचरण सेविता । गुरुने शिष्यास पाहता ।
पाहता पाहता स्वभावता । सोऽहम प्रगटले ।।५३।।

जे आहे अंतरी वसले । तेचि सद्गुरुने सांगितले ।
सांगता सांगता अनुभवले । आपणचि ब्रह्मरुप सोऽहम ।।५४।।
नित्य नेमे सोऽहम स्मरण । तेणे पडेल देह विस्मरण ।
प्राप्त होईल स्वरुपज्ञान । मनी सोऽहम दृढ धरा ।।५५।।
हृदयी नांदे पराशांती । सर्वाभूती परमप्रीती ।
अंतःकरणाची आनंद स्फूर्ती । सोऽहम ज्ञानाने ।।५६।।
जीव शिव भ्रम नाही । अंतरात स्वरुप पाही ।
संदेह संशय कांही नाही । सोऽहम भावाने ।।५७।।
देहभाव निरसूनि गेला । द्वैतातूनि अद्वैती झाला ।
आत्मभाव प्रकाश पडला । सोऽहम ज्ञानाने ।।५८।।
विचार करुनि स्वये पहावा । अंतरीच आत्मा शोधावा ।
आत्मलाभ घेऊनि भोगावा । ब्रह्मानंद सोऽहम लाभाने ।।५९।।

आपुलेचि स्वरूप जे दिसते । तेचि सगुण स्वरुप असते ।
जे हृदयी असते तेचि प्रगटते । सोऽहम भक्तीने ।।६०।।
विचारे विचार करावा । विचारे विचार पहावा ।
विचारे विचार आचरावा । हा सोऽहम बोध ।।६१।।
प्रियोत्तम सांगतो सर्वांसी । विचार करावा आपुल्यासी ।
विचार करूनि पहावे आपणासी । सोऽहम भावे ।।६२।।
नित्य करावा मना बोध । जन्मा येऊनि घ्यावा आत्मलाभ ।
बोधिता बोधिता होतो लाभ । सोऽहम स्वरुपाचा ।।६३।।
मानवाने ब्रह्मचिंतन करावे । सुख सौख्याने नांदावे ।
सर्वाठायी ब्रह्म पहावे । सोऽहम सोऽहम भावे ।।६४।।
ज्यांचे अंतरी ज्ञान-भाव स्फुरण। जे सहजासहजी होते हृदयीजाण।
त्या सर्वांचे एकमेव कारण । साक्षात्कार सोऽहमचा ।।६५।।

ज्यांचे चित्त असे निर्मळ । त्यांचे वसे प्रभू जवळ ।
स्मरण ठेवावे सोऽहम भावे केवळ । आत्मानुभूती तेथे ।।६६।।
देव देवी प्रभू अंतरी । का हिंडता व्यर्थ बाहेरी ।
नका घेऊ तुम्ही शीण भारी । सोऽहम ने जाणा ।।६७।।
विश्वी जैसे ब्रह्म भरले । तेचि पिंडीही असे वसले ।
पिंडी ब्रह्मांडी एकची भरले । ते सोऽहम ने कळले ।।६८।।
साक्षित्वाचे जे देखणे । तेचि सोऽहम भाव अनुभवणे ।
सोऽहम भाव सहजचि जाणणे । हा प्रियोत्तम धर्म ।।६९।।
सुखप्राप्तीचे खरे साधन । पहावे आपुल्या अंतरी जाण ।
सर्व सुखाची जाणीवपण । सोऽहम भावे येते ।।७०।।
अंतरीच चैतन्य । ते तुझेचि स्वरुप जाण ।
त्या चैतन्याचे व्यापकपण । सोऽहम ने जाणावे ।।७१।।

श्रीगुरुचे करावे स्मरण । ॐ सोऽहम भावे अखंड चिंतन ।
सदा ठेवावे पवित्र मन । तेणे सुख पावाल ।।७२।।
श्री देवदेवीची करुनी भक्ती । करुन घ्यावी स्वरुप प्राप्ती ।
साऽहम् भावे घ्यावी प्रचिती । सगुण निर्गुणाची ।।७३।।
सोऽहम भावे असो द्यावा । प्रियोत्तमयोग आचरावा ।
सोऽहम जपे अखंड करावा । अनन्यभावे ।।७४।।
शिव शिव महादेव । देवी देव देवाधिदेव ।
सर्वजण पूजिती सोऽहम भाव । भावानंदाने ।।७५।।
वेद श्रुति स्मृति । सर्व संत साहित्यी ।
ज्ञानी तत्त्वज्ञ गाती । सोऽहम सोऽहम ।।७६।।
ॐ सोऽहम बीज नाम मंत्र । जपत आले महाभक्त ।
सर्वचि झाले कृतार्थ । सोऽहम भावे ।।७७।।

सोऽहम भावी जो रंगला । तो सहजचि ज्ञानी झाला ।
सर्व व्यवहार करुनि गेला । स्वरुपा ठायी ।।७८।।
ब्रह्मरुपे जग नटले । अंतर्बाह्य तेची वसले ।
नित्यानुभवा सर्वा आले । सोऽहम भाव-भक्तीने ।।७९।।
सर्व सत्ताधीश जो परमात्मा । त्यासचि म्हणती विश्वात्मा ।
सर्वा ठायी तोचि आत्मा । सोऽहम ने कळते ।।८०।।
आत्म ओळख महाकठिण । ती सहजासहजी न होय जाण ।
आत्मानुभवाची खरी खुण । सोऽहम ने कळते ।।८१।।
जे जे दिसते नयनासी । आनंद वाटतो जो मनासी ।
कारण त्याचा संबंध स्वरुपासी । सर्वात्मा सोऽहम ।।८२।।
ॐ सोऽहम् श्रीम सोऽहम् । तत्व सोऽहम्सो सोऽहम् ।
ॐ सोऽहम हंसाः सोऽहम् तत्वं। ॐ सोऽहम् सोऽहम सोऽहम ।।८३।।

।। ॐ तत्त्वं सोऽहम् सा: ।।

सोऽहम् भाव चिंतन सार । करिता करिता होतो स्वरुपाकार ।
स्वरुपाकार होता सोऽहम् भावसार । अंगी सहजचि मुरला ।।१।।
अंगी मुरला सोऽहम् भाव । तेथे तू मी हा भेद जाय ।
भेद जाऊनी स्वस्वरूप होय । सोऽहम् भावही गेला ।।२।।
अंत:करणी अनुभूती आली । सोऽहम् भावाची जाणीव ठसली ।
जप विचार साधना संपली । अंत:करणी ब्रह्मानंद ।।३।।
काही कोठेचि द्वैत दिसेना । ब्रह्माविण कांहीच असेना ।
अंत:करणी भेद भासेना । सोऽहम् अंगी मुरले ।।४।।
तो मी तो मी म्हणत आलो । परी मी तो एकचि झालो ।
कांहीच न मी आता उरलो । अहम् सोऽहम् म्हणूनी ।।५।।

अहम् सोऽहम् तेही गेले । सर्वां ठायी एकचि दिसले ।
दिसले तेचि अंगी रंगले । रंगला एकचि आनंद ।।६।।

आनंदाचा आनंद झाला । सोऽहम् चा छंदही गेला ।
बंध मुक्तीचा छेद केला । स्व-स्वुरपा नव्हता जो ।।७।।

।। ॐ सोऽहम् ।।

श्री देवीची वाणी

।। प्रियोत्तम भावबोध ।।

भाव म्हणजे प्रीती । बोध म्हणजे सुक्ष्म गती ।
या दोहोची घेऊनी अनुभूती । सिध्द व्हावे तुम्ही ।।
भावबोधाविण उपाय जितुके । ते व्यर्थचि जाणावे तितुके ।
म्हणूनिया निश्यात्मके । भावबोध धरावा ।।

卐 ॐ 卐

सुलभ बोलिला वेदान्त । भावबोध स्वरुपात ।
करुनी भक्तांनी आत्मसात । कृतार्थ व्हावे ।।
होता भावबोध । तो होतो परमसिध्द ।
ऐसी वाणी प्रसिध्द । प्रियोत्तमाची ।

– प्रियोत्तमानंद

।। ॐ ।।

परस्परं भावयन्तः गीता (३-११) परस्परांनी परस्परांना भाव
देऊन आनंदाने आमकल्याण करून घ्यावे.

बोधयन्तः परस्परम् – गीता (१०-९)
परस्परांना बोध करीत संतुष्ट राहतात
ज्ञानदीपेन भास्वता – गीता (१०-११)

तेजस्वी ज्ञान दीपाने अज्ञान नाहीसा करतो

भावेन लभ्यते सर्वम् । भावेन देव दर्शनम् ।
भावेन परम ज्ञानम् । तस्मात भवावलबनमे ।।

भावाने सर्व प्राप्त होते. भावदृढतेने देवदर्शन होते.
भावाने ज्ञान प्राप्त होते. याकरता भावाचा अवलंब करावा.

।। विचारात् जायते बोधः ।।

विचारानेच बोध होतो.

।। यादृशी भावना यस्य सिध्दिर्भवति तादृशी ।।

ज्याची जशी भावना तशी त्याला सिध्दी प्राप्त होते.

वाचूनि ज्ञानेविण एके । उपाय करिसी जितके ।
तिही गुंफसी अधिके । रुखी इये ।। १५-२४९

– ज्ञानेश्वरी

होता तत्त्वबोध । लाभे पराशांती । जीवसी विश्रांती । स्वामी म्हणे।।

- सद्गुरु स्वरुपानंद

।। ॐ आनंद ।।

।। ॐ ।।

श्री देव देवी देवाची करूनी भक्ती । सद्गुरूची घेऊनी शरणागती ।
अंत:करणी करूनी शुध्दी । भावबोध धरावा ।।१।।
जैसी जैसी होते शुध्दी । तैसी तैसी होते भाववृध्दी ।
भाववृध्दीची होता सिध्दी । भावानंदी रंगतो ।।२।।
जैसा जैसा अंतरी भाव । तैसा तैसा येतो अनुभव ।
येता येता होतो परमदेव । ब्रह्मरुप जो ।।३।।
एका ब्रह्हावाचून कांही नाही । ऐसा विचार मनी राही ।
निश्चळ बोध स्वये हदयी । आपोआप असावा ।।४।।

बोध मनी नित्य धरावा । अंतरी ब्रह्मभाव जोडावा ।
वेळोवेळी स्मरावा । सद्गुरु ।।५।।
श्री सद्गुरु कृपेविण । करू नये तत्त्वबोध स्मरण ।
श्रवण होता दर्शन । होते स्वरुपाचे ।।६।।
स्व-स्वरुपा नित्य विचार । हा साधकाचा आचार ।
नित्य नेमे हा विचार । सोडूच नये ।।७।।
अंतरीची अनुभूती । नित्य वाढते प्रचिती ।
ऐसी साक्षात्काराची रीती । नित्य अनुभवा येईल ।।८।।
ऐकावे श्रध्दा ठेऊनी वचन । हेच ठेऊनी प्रमाण ।
जो करील नित्य साधन । तो सिध्द होईल ।।९।।
विचार करता प्रकाश । अंतरी येतो सावकाश ।
सूक्ष्म पाहता स्वत:स । स्वरूप सहज कळते ।।१०।।

तत्त्वज्ञानाचा शोध । हाच अभ्यासाचा गाभा ।
अभ्यासे लाभे बोध । तत्त्वज्ञानाचा ।।११।।
सांगते मी तत्त्वज्ञान । श्रध्दाभावे करा श्रवण ।
भावबळे आत्मदर्शन । होईल स्वरुपाचे ।।१२।।
स्व-स्वरूप दर्शनाविण । व्यर्थ जाण तू जीवन ।
म्हणून सदा प्रयत्न । करीत जावे ।।१३।।
प्रारब्धे होतो प्रपंच । प्रयत्ने होतो परमार्थ ।
हा निर्णय मनी सार्थ । निश्चये धरावा ।।१४।।
प्रियोत्तमी ठेऊनी मन । जो करील नित्य साधन ।
त्याचे होईल कृतार्थ जीवन । वरदहस्त श्रींचा ।।१५।।
श्री सांगते जे वचन । ते सिध्दबोध प्रमाण ।
त्या शब्दांचे खंडन । कधी न होय ।।१६।।

स्व–स्वरुपी नित्य रमावे । भावानंदी सदा डोलावे ।
आनंदभरे रहावे । सहजस्थितीत ।।१७।।
मल विक्षेप आवरण । त्याचे होण्या निरसन ।
एकच त्यास साधन । शरण जावे सद्‌गुरुसी ।।१८।।
ब्रह्मच आहे सद्‌गुरु । तोच तुम्हासी तारु ।
त्या बोधाने पैलतिरू । जाल तुम्ही नि:शंक ।।१९।।
भावविचार पूर्ण झाला । जेव्हा बोध अंतरी ठसला ।
तेव्हाच अंतरी सुखावला । जीवात्मा ।।२०।।
जीवात्मा परमात्मा एक होतो । अंतरी आनंद प्रगटतो ।
सुखानंदी भोग भोगतो । भाव समाधीत ।।२१।।
अखंड ही भाव समाधी । तेथे कांहीच न राहे उपाधी ।
अंतरी घेऊनी अनुभूती । निरंतर निरंजन झाला ।।२२।।

साधक जेव्हा बोधी होतो । तेव्हाच तो सिध्द होतो ।
बोध बोधी रंगुनी जातो । बोधामृते ।।२३।।
भावबोधामृते अशी महती । तिची करावी प्राप्ती ।
प्राप्तीने लाभे आत्मशक्ती । जी अपार असे ।।२४।।
विचार व चिंतन । हेच खरे आहे पूजन ।
पूजन हेच अर्चन । मनी धरावे ।।२५।।
जीव उपाधी सोडावी । स्वरूपी वृत्ती ठेवावी ।
सदा सर्वदा स्मरावी । ब्रह्ममूर्ती ।।२६।।
आपण ब्रह्मभाव मूर्ती । हीच स्फुरवा कृती ।
अखंड राहे ही स्थिती । तदाकाराने ।।२७।।
केवळ शुध्द स्वरूप चिंतन । तेथे सर्व साधन विसर्जन ।
स्व-स्वरुप चिंतनाविण । कांहीच न करावे ।।२८।।

स्वरुप चिंतनी चित्त रमता । चैतन्यच ते होईल तत्त्वता ।
चित्त चैतन्याची एकता । सहज लाभेल ।।२९।।
ब्रह्मभावे जग पहावे । ब्रह्मभावेच चिंतावे ।
ब्रह्मभावेच वंदावे । मूळ भावब्रह्ह जे ।।३०।।
ब्रह्मभावे करावे पूजन । ब्रह्मभावे करावे दर्शन ।
ब्रह्मभावे सदा समर्पण । कार्य करावे ।।३१।।
ब्रह्मभावे करावी भक्ती । ब्रह्मभावे करावी प्रीती ।
ब्रह्मभावे करावी कृती । ब्रह्मलीला म्हणोनी ।।३२।।
ब्रह्मभावे जो ऐसे करी । तोच हा बोध भारी ।
अंतरी बाहेरी स्वीकारी । वृत्ती ऐसी ।।३३।।
ब्रह्माविण नसे काही । अंतर्बाह्य चराचरी ।
अंतरी बाहेरी दृष्टी धरी । ब्रह्मची ।।३४।।

ब्रह्मातून जे प्रगटले । ते सर्व ब्रह्मरुपीच वसले ।
ब्रह्मी ब्रह्मच झाले । नाना रुपे ।।३५।।

नाना रुपे नाना गुणे । नाना स्वरुपे नाना भिन्ने ।
ही सारी भिन्न लक्षणे । एकाच ब्रह्माची ।।३६।।

ब्रह्माविण बोध घेणे । ही अज्ञानाची लक्षणे ।
जगी ब्रह्मबोध धरणे । ही बोध खरा ।।३७।।

तत्त्वबोधाचा खरा शोध । हाच खरा सिध्द लाभ ।
ज्याचे अपार सद्भाग्य । त्याला हे लाभते ।।३८।।

काहीच धरू नये मनी । ब्रह्मबोध हेच ध्यानी ।
ध्यानी मनी स्वप्नी । ब्रह्मच भरले ।।३९।।

जीव जगाचा व्यवहार । ही ब्रह्मलीला सार ।
हाच व्यवहार ब्रह्माकार । ब्रह्माने झाला ।।४०।।

ब्रह्माचे हे करते पण । जे दिसते त्याचेच प्रगटन ।
अकर्तृत्वातून करते पण । ऐसी लीला वाटते ।।४१।।
वाटे जरी तुम्हासी असे । परी ते अकर्तृत्वची असे ।
ठायीच राहोनि ती होतसे । विश्वक्रीडा ।।४२।।
गुण वार्ता आणि कर्ता । ही नाहीच त्याला तत्त्वता ।
या सर्वांहुनी पूर्णतः तो वेगळा असे ।।४३।।
करून असे अकर्ता । भोगूनी असे अभोक्ता ।
विश्वी भरूनी असता । परी वेगळा ।।४४।।
ज्याचे योगे सर्व होते । परी त्याला ते न बाधते ।
विश्वी सर्व क्रीडा चालते । परी तो मुक्त ।।४५।।
ब्रह्माची ही अगम्य लीला । करून बोध मनाला ।
अनंत अतर्क्य ब्रह्माला । भावेच पहावे ।।४६।।

तेच आहे मुळी निर्गुण । तेच होते सगुण ।
सगुण ते साकार । विश्वाकार झाले ।।४७।।
ईश्वर सगुण विश्व साकार । या दोन्ही स्वरूपाचा आकार ।
मूळ तत्त्वाचा हा प्रकार । स्वभावे झाला ।।४८।।
हे स्वभावे कैसे होते । याचे उत्तर कोण देते ।
शब्दाविण समतजे । भावबोधाने ।।४९।।
कांही समजते बुध्दीला । कांही समजते मेधेला ।
पूर्ण समजते प्रज्ञेला । अनुभूतीजन्य ।।५०।।
बुध्दी मध्येच ज्याची स्थिती । त्यांना कैसी समजे स्वरूपस्थिती ।
शुध्द झाली ज्यांची मती । ते कृतार्थ ।।५१।।
या युगी भावबोधाचा मान । भावरूपे यशस्वीपण ।
हा कलियुगाचा महिमा जाण । तम्ही मनी धरावा ।।५२।।

भावबोध मार्ग सनातन । त्यात आहे सुलभपण ।
सहजपणे आचरण । करता येते ।।५३।।

प्रियोत्तमयोग प्रगटला । त्याने हा मार्ग धरला ।
भावबोध सांगू लागला । भक्त गणासी ।।५४।।

परमभाव बळे बळावे । भाव बळे आकळावे ।
भावबळे मिळवावे । स्वरूप आपले ।।५५।।

परमभाव बळे होईल प्राप्ती । भावयोगे होईल स्वरुप स्थिती ।
भावबळे राहील वृत्ती । स्वरूपा ठायी ।।५६।।

परमभावे चालावे । परमभावे सर्व करावे ।
परमभावेच राहावे । आपुल्या जीवनी ।।५७।।

जीव हा मुळी ब्रह्मरुपी । अज्ञाने जाहला देहरुपी ।
याची जाणीव आपणासी । भावबोधे होईल ।।५८।।

विचार करूनी बोध घ्यावा । भाव धरूनी ठसवावा ।
ठसवुनी ठसवुनी भरावा । अंत:करणी ।।५९।।
अंत:करणी भरला भाव । तोच होतो ब्रह्मदेव ।
ब्रह्मदेव ब्रह्मभाव । जया अंगी भरला ।।६०।।
प्रियोत्तम तत्त्व परमभावी । तोच हा मार्ग दावी ।
ज्यांनी त्यांनी करूनी घ्यावी । प्राप्ती या योगाची ।।६१।।
प्रियोत्तम भाव योगसिध्दी । बाळबोध सुलभ शोध ।
सामान्य जीव होती सिध्द । या योगे ।।६२।।
भावबोधाची जननी । प्रियोत्तममयोग वाणी ।
ही सर्वांना सांगते जनी । प्रियोत्तम भावे ।।६३।।
व्हावे व्हावे प्रियोत्तम । स्वस्तिक शुभ सर्वोत्तम ।।
उत्तमोत्तम प्रियोत्तम । तुम्ही व्हावे ।।६४।।

प्रियोत्तम व्हावे सर्वांनी । विश्वास ठेऊनी मनी ।।
बोध घ्यावा भाव ठेऊनी । प्रियोत्तमाचा ।।६५।।

प्रियोत्तमाचा भाव मार्ग । हाच खरा सुखाचा गर्भ ।
या गर्भी राहुनी सुखवर्ग । मिळवावा ।।६६।।

सुखवर्ग मिळवावया । शरण जावे सद्गुरु राया ।
त्याने होईल ब्रह्मरुप काया । भाव बोधाने ।।६७।।

भावबोध अती बोधक । श्रवण करताच सार्थक ।
परी विश्वासाची निश्चयात्मक । वृत्ती असावी ।।६८।।

निश्चयात्मक विश्वासाने । श्रध्दाबळे प्रयत्नाने ।
साधकाने आपुल्या मनाने । भावबोध धरावा ।।६९।।

भावबोधचे करूनी साधना । अंतरी ब्रह्मविचार विचारणा ।
विचार बोध भावना । एक करावी ।।७०।।

विचार बोध भावना । यांची झालीया एकपणा ।
साक्षात्कार त्याच क्षणा । होईल प्रियोत्तम मार्ग ।।७१।।
तत्त्वाचा करावा विचार । विचारे घ्यावा बोध सार ।
बोध होता भाव फार । अंतरी प्रकटे ।।७२।।
भाव बोधाची होता युती । लगेच होते आत्मप्राप्ती ।
तेथे फिटते सर्व भ्रांती । जीवदशेची ।।७३।।
जेव्हा ईश्वरी कृपा होते । तेव्हा ती कृपा बोध करते ।
त्या बोधाने प्राप्त होते । ज्ञानशक्ती ।।७४।।
अंतरी आहे बोध देवता । तेथेच आहे भाव देवता ।
बोध भावे आत्मदेवता । प्रसन्न होते ।।७५।।
भावबळे जीव रंगतो । तेथेच बोध प्रगटतो ।
भावबोधे ब्रह्मच होतो । जीव अपुला ।।७६।।

प्रारंभी ब्रह्मभावे जीव रंगावे । जीव रंगता बोध घ्यावे ।
अंतरीच जो स्वभावे । मग येतसे ।।७७।
अंतरीच जो परमात्मा । तोच बोध देतो तत्त्वता ।
त्याचीच बोधभाव सत्ता । अंतरी असे ।।७८।।
बोधभाव सत्ताधीश । तोच प्रियोत्तम ईश ।
साक्षात परमात्मा परमेश । जगी प्रगटला ।।७९।।
प्रियोत्तम विचारसरणी । ही ठेवा भक्तिभावे मनी ।
त्यांचे प्रवचण सिध्दवाणी । ऐकून कृतार्थ व्हावे ।।८०।।
संसार तरावया । स्व-स्वरुप पावावया ।
भावबोध घ्यावावया । ऐकावी वाणी श्रींची ।।८१।।
श्रुति स्मृतीचे वचन । त्याचे केले साधेपण ।
सामान्य शब्दात सांगून । सुलभ केले जना ।।८२।।

तत्त्वविचाराच जे ज्ञान । ते सर्व श्रुति शास्त्रप्रमाण ।
श्रीने धरले स्वरुप जाण । प्रियोत्तम मार्गे ।।८३।।
श्रुतीत जो आहे भावबोध । तोच येथे आहे सिध्द ।
सिध्दबोधे भावबोध । मनी धरावा ।।८४।।
ब्रह्म हे मूळ भावस्वरूप । भाव भरले विश्वरूप ।
विश्वी सर्वत्र भाव खूप । प्राणीमात्रात असे ।।८५।।
सर्वाठायी भावस्थिती । सर्वांनाही प्रचीती ।
तीच खरी सत्य प्राप्ती । भावबोधे घ्यावी ।।८६।।
भाव बोधेविण । अध्यात्मच नव्हे जाण ।
भावबोधाची खूण । अंतरी ये तसे ।।८७।।
ब्रह्मभावे जग भरले । त्याच भावे ते चालले ।
परमभावाने भक्त झाले । परमश्रेष्ठ ते ।।८८।।

भावानेच देव प्रगटले । देव भावानेच भाळले ।
देवलोक सोडूनि आले । भक्तीबळाने ।।८९।।
देवाला भावाची प्रीती । त्यापाई सोडून येती ।
येऊनी भक्त घरी राहती । प्रेमानंदाने ।।९०।।
भावबळाची हाक ऐकूनी । देव येतात धावत झणी ।
ही भावबळाची करणी । जगी असे ।।९१।।
भावबोधाचा महिमा । सांगते मी प्रियोत्तमा ।
भक्तगणांच्या येईल कामा । प्रियोत्तमयोग ।।९२।।
तत्त्व भाव बोध विचार । याचा करूनी समन्वय थोर ।
तुम्हा येईल अनुभव फार । क्षणाक्षणासी ।।९३।।
भावबोध मार्ग अती उत्तम । त्याने लाभते प्रियोत्तम ।
त्यासच म्हणती पुरुषोत्तम । सगुण ब्रह्मरूप जे ।।९४।।

भावबोध मनी धरा । प्रियोत्तम मार्ग स्वीकारा ।
प्रियोत्तम विचार श्रवण करा । भक्तिभावे ।।९५।।
भावबोधाचा ज्ञानयज्ञ । त्याचा करावा यत्न ।
यत्ने प्रयत्ने करून यज्ञ । बोधामृत घ्यावे ।।९६।।
बोधामृते होते तृप्ती । भावबळे येते शक्ती ।
शक्ती तृप्तीची युती । त्यायोगे लाभते ।।९७।।
भावबोधे जे तृप्त झाले । त्यांच्या अंतरी ज्ञान प्रगटले ।
स्व-स्वरुपी तदाकार झाले । भाव बोधबळे ।।९८।।
भावबळाची होता प्राप्ती । आत्मलाभाची तेथे स्थिती ।
त्यासच म्हणावे परमगती । ब्रह्मपद जे ।।९९।।
तू स्वतः सिध्द ब्रह्मस्वरूप । तेच आहे तुझे स्वरूप ।
अंतरी प्रगटे आपोआप । भावबोधे ।।१००।।

तूच आहे ब्रह्मरूप । नित्य निरंजन सुखरूप ।
स्वतः सिध्द नित्य मुक्त । परब्रह्म जे ।।१०१।।
तूच तूच ब्रह्म जाण । भावबोधे हे वचन ।
त्याने येईल सिध्दपण । भाव बोधाने ।।१०२।।
निःसंदहे ठेऊनी मन । ज्याने धरला विश्वास जाण ।
तेच भावबोध खूण । जाणतील ।।१०३।।
भाबबोधाची खूण । अंतरी प्रगटे नारायण ।
सर्वत्रच होते दर्शन । परब्रह्माचे ।।१०४।।
भावबोधाची अमृतवाणी । ज्याने ठेवली अंतःकरणी ।
तो निश्चित झाला आत्मज्ञानी । श्री देवीवाणी सांगते ।।१०५।।

****

सुलभा बोलिला वेदान्त । भावबोध स्वरुपात ।
करूनी भक्तांनी आत्मसात । कृतार्थ व्हावे ।।

।। ॐ सोऽहम् ।।

।। प्रियोत्तम स्वरूप सिध्दी ।।

।। ॐ सोऽहम् ।।

आत्मस्वरूप स्वयं प्रकाशित । सदा सर्वदा ते अलिप्त ।
अनादि परमभाव सत्य तत्त्व । परब्रह्म सिध्दस्वरुप ते ।।
आपले स्वरूप ज्ञानमय । प्रेम शांति आनंदमय ।
अखंड स्वरुपी तन्मय । हा धर्म प्रियोत्तमाचा ।।
सद्गुरू कृपा जाहली । तेणे सिध्दस्वरुपता लाभली ।
अंतर्बाह्य वृत्ति लागली । ब्रह्मानंदाची ।।

परमभाग्याची तीच रेषा । आत्मज्ञानाचीच जया मनिषा ।
आवड ठेवूनि सिध्द हो पुरुषा । हा प्रियोत्तमाचा संदेश ।।

सोऽहम् दावितो रूप । सुख देतो अमूप ।
लावितो ज्ञानदीप । स्वरुपाचा ।।

– प्रियोत्तमानंद

झणी सोऽहम् दीप लावूनी अंतरी । म्हणे गा निर्धारी आत्मरुप ।।

– स्वामी स्वरुपानंद

।। ॐ सोऽहम् ।।

आपण पहावे आपणासी । संलग्न व्हावे स्वरुपासी ।
ज्यांचा संबंध अनंतासी । अनादि तत्त्व जे ।।१।।
स्वरूप केवळ परमभावे । अनुभवावे अनुभवावे ।
अंतर्यामीच ध्यावे पहावे । स्व–स्वरुप जे ।।२।।

शब्द नाही विचार नाही । ध्वनी जाणीव नाही काही ।
केवळ शुध्द स्वरुप राही । निर्लेपपणे ।।३।।
ज्यातून सर्व काही झाले । परी ते वेगळेच राहिले ।
वेगळे राहून आनंदविले । मानव हृदयी ।।४।।
मानवाच्या अंतर्यामी । स्वरूप आत्मा तो मी ।
त्यातचि सारे तुम्ही आम्ही । ब्रह्मरूप जे ।।५।।
ब्रह्माविण काही नाही । जेथे तेथे तेचि पाही ।
पाहून घेऊन सेवून राही । आपुल्या स्वरूपी ।।६।।
प्रकाशाने भाव स्फुरतो । स्फुरतो स्फुरण आनंदतो ।
आनंदी आनंद प्रगटतो । आपुल्या ठायी ।।७।।
भावतंद्रीत स्वरूप चिंतावे । भावरुपात व्यवहार करावे ।
भाव भावस्थितीत रहावे । भावसमाधीत ।।८।।

निर्विषय करूनी चित्त आपुले । एकांती आनंदास अनुभविले ।
सुखस्थितीत जीवन वसले । स्वरुपस्थितीने ।।९।।
आपली वृत्ती स्वरूपच पाही । विषय गुण नाही काही ।
अंत:करण स्वरूपचि पाही । परमभावशांतीने ।।१०।।
मन बुध्दी चित्त अहंकार । सर्वचि झाली स्वरुपाका ।
आनंदी आनंद स्फुरण अपार । स्वरुपस्थितीने ।।११।।
सहजा सहजी जी स्थिती । केवळ आनंदाची येई प्रचिती ।
तीच खरी ब्रह्मभावस्थिती । ब्रह्मपद जे ।।१२।।
ब्रह्मज्ञानी असे ब्रह्मानंदात । स्वरूपाकार स्वरुपात ।
परी अंतर्यामी एकच ज्योत । ज्ञानाची तेवते ।।१३।।
विषयसुखाची वार्ता संपली । भावस्वरूपस्थिती लाभली ।
जेथे तेथे अनुभूती येऊ लागली । ब्रह्मस्थितीची ।।१४।।

तद्रुपाने विषय वृत्ती संपली । काही कोठे वासना ना उरली ।
अंतर्यामी संतुष्टता आली । आपोआप ।।१५।।
अवती भोवत जी स्थिती । ब्रह्मभावाचीच सारी मूर्ती ।
आनंदी आनंद वाटतो चित्ती । जगी सर्व ब्रह्म दिसे ।।१६।।
ब्रह्म ब्रह्मची होऊनी नटले । त्यांनीच सर्व काही थाटले ।
थाटूनी थाट चालविले । सारी ब्रह्मलीला ।।१७।।
ब्रह्माची ही ब्रह्मलीला । अंतर्यामी तोचि वसला ।
आंत बाहेर तोच बसला । भावभावाने ।।१८।।
ब्रह्माचीही अगम्य लीला । सहज विचारे न कळे कुणला ।
म्हणू पहावे अंतर्यामी त्याला । परमभाव ठेवूनी ।।१९।।
वेडी बावरी बुध्दी असते । विषयी विकारे स्वैर धावते ।
स्वरूपाला सहज विसरते । ती सावरावी ।।२०।।

पहा पहा ब्रह्मक्रीडा । अंतर्यामीच त्यांचा निवाडा ।
आत्मानात्म विचार खडा । तुम्ही तो पहा ।।२१।।
खडाखडी पहावे । धडाधडी निवडावे ।
फडाफडी ठरवावे । स्वरूप आपुले ।।२२।।
कसली स्थिती कसली भीती । एकच असावी निश्चयस्थिती ।
ब्रह्मरूपाविण नच पहाती । सिध्दलोक ।।२३।।
विचारांचा गलबला । सावरूनि धरावे त्याला ।
आत्मनिष्ठ करावे बुध्दीला । स्वरूप ओळखुनी ।।२४।।
परम मंगल भावस्थिती । प्राप्त व्हावया ब्रह्मस्थिती ।
अंत:करणी घ्यावी आपुल्या चित्ती । ब्रम्हभावाने ।।२५।।
अंत:करणी नाना कल्पना । विषयी वृत्तीच्या त्या कल्पना ।
तेणे चंचलता येई मना । अस्थिरपणे ।।२६।।

ब्रह्म असनि ब्रह्म दिसेना । सुख इच्छुनि सुख भेटेना ।
आनंदाची वार्ता भासेना । विस्मृतीने ।।२७।।
चंचल मनोकामना । नाना साधनांची इच्छा मना ।
प्राप्तीसाठी अनंत यातना । सोशिती अज्ञजन ।।२८।।
अज्ञजने संसार रचिला । त्यात तो पूर्णपणे फसला ।
फसून रचून तोच चालला । स्वरूप सोडूनी ।।२९।।
स्वरूपसिध्दीची नव्हे चाड । संसाराची न सुटे भीड ।
सदा सर्वदा त्यासी आवड । विषयसुखाची ।।३०।।
वैराग्य अंगी बाणावे । ब्रह्मस्थितीत रहावे ।
सदा सर्वदा असावे । स्वरूपाठायी ।।३१।।
ऐसे न येई कधी मनी । विषय चिंतन सदा ध्यानी ।
संसार करूनि बसला सदनी । सत्यस्वरूप सोडूनी ।।३२।।

स्वरूपसिध्द जो पुरुषोत्तम । त्यासचि म्हणती प्रियोत्तम ।
प्रगटला विश्वी उत्तमोत्तम । अध्यात्मरूपे ।।३३।।
प्रकाश अंधार दोन्ही अनादि । प्रकाश म्हणजे असे सिध्दी ।
निवड करूनि पावला पदी । परब्रह्माच्या ।।३४।।
परमभाग्याची तीच रेषा । आत्मज्ञानाचीच जया मनिषा ।
आवड ठेवूनि सिध्द हो पुरुषा । हा संदेश प्रियोत्तमाचा ।।३५।।
संशय संदेहाची नाही वार्ता । तया अंतरी लाभली स्थिरता ।
अखंड नांदते प्रसन्नता । ब्रह्मज्ञानाने ।।३६।।
ज्या स्मरणाने विस्मरले । ज्या विस्मरणाने स्मरले ।
ज्याने स्मरले ते अनुभवा आले । ब्रह्मानंद स्वरूप जे ।।३७।।
विषय स्मरणे स्वरूप विसरले । स्वरूप स्मरणे विषय विसरले ।
विषय विस्मरणे स्वरूप लाभले । अंतर्यामी ।।३८।।

आपण करावो आपुली प्राप्ती । हीच पुरुषार्थाची खरी कृती ।
स्वरूपसिध्दीची सत्यस्थिती । अमर असे ।।३९।।
अमर होऊनि अमर रहावे । ऐसे मार्ग मनी शोधावे ।
अंतर्यामी तेच पहावे । ध्येय मूर्त आपुले ।।४०।।
ब्रह्मचिंतूनि ब्रह्म पाहतो । ब्रह्म पाहता ब्रह्मचि होतो ।
होता होता पूर्णचि होतो । सिध्दपुरुष ।।४१।।
एकात एकचि आहे । अनेकात एकचि आहे ।
अनेकीही एकचि एक आहे । एकचि एक ते ।।४२।।
अद्वैती द्वैत आहे । द्वैत ही अद्वैत आहे ।
अद्वैत द्वैत एकच आहे । एकच एक ते ।।४३।।
एकाने अनेक केले । अनेक होऊनी एकच राहिले ।
ऐसे जेव्हा अनुभवा आले । ती स्वरूपसिध्दी ।।४४।।

पहा पहा आपुले मनी । पाहता पाहता येते ध्यानी ।
ध्यानी मनी येते स्वप्नी । ब्रह्म ब्रह्मची नटले ।।४५।।
कोठे काहीच दुसरे नाही । ब्रह्माविण नाही कांही ।
उगीच फिरणे ठायी ठायी । विविधतेने ।।४६।।
विविधता कैसी दिसली । हीच नाना कल्पनेची साऊली ।
कल्पना जेव्हा विसरली । तेव्हा ब्रह्म एक दिसले ।।४७।।
दृश्य अदृश्य दिसती वेगळे । परी ते तत्त्वत: एकचि सगळे ।
परब्रह्म्याचे ठायी सर्व मिळाले । एकत्वाने ।।४८।।
संशय कल्पनेचा करूनि अंत । स्वरूपाठायी ठेवूनि चित्त ।
सदा सर्वदा आनंदात । विषयाविण रहावे ।।४९।।
कामना वासना निमाली । वृत्ती स्व-स्वरूपी रंगली ।
भावानंदी समाधी लागली । निर्विकल्पची ।।५०।।

संसारी असुनि अलिप्त । सदा सर्वदा निरपेक्ष ।
ईश्वरासी ठेवूनि साक्ष । जगी विवरे ।।५१।।
विकार वासना निमाली । वृत्ती तदाकार झाली ।
प्रेमभावे क्रिया चालली । सहजतेने ।।५२।।
जेव्हा वर्ततो तो व्यवहारी । साक्षीत्वाने कार्य करी ।
आपपर भेद मुळीच न धरी । तयाच्या कार्यी ।।५३।।
सहज पाहतो राहतो । ब्रह्मभावे सदा वर्ततो ।
सर्वाभुती आपणच पाहतो । आत्मोपम्य भावाने ।।५४।।
आपणच भरला सर्वाठायी । ऐसी वृत्ती त्याची राही ।
आपुल्याविण ठाव नाही । कुठे कुणाचा ।।५५।।
मीच नटलो सर्वांतरी । ऐस भाव जया अंतरी ।
सर्वाभूती तो नमस्कारी । एक ब्रह्म म्हणूनी ।।५६।।

अन्यता एकता स्वरूपासी । जेथे तेथे पहातो भगवंतासी ।
भक्तिभावे वर्तती प्राणिमात्रासी । दयाळूपणे ।।५७।।
परमानंदी परम प्रीती । सदा सर्वदा अपार स्फूर्ती ।
प्रेरणा भावेनी अपार शक्ती । प्रज्ञा प्रतिभा अंतर्यामी ।।५८।।
विश्वात्मैक्य भाव ठेवितो । ब्रह्मब्रह्मचि विश्वी सांगतो ।
ब्रह्माविण कांही न पहातो । सर्वांठायी ।।५९।।
आपण आपुल्या ठायी । अपार आनंद लाभ घेई ।
सुखानंदाची अनुभूती येई । स्वयंभूपणे ।।६०।।
विषय स्पर्शाने न भंगतो । चित्त सर्वदा अभंग ठेवितो ।
प्रसन्न मन सदा असतो । अभंगपणे ।।६१।।
ज्ञानियाची विषय लिला । कदापी न बाधे ती त्याला ।
देहभावाहून वेगळा झाला । म्हणून तो निर्दोष ।।६२।।

निर्दोष एकटा एक ज्ञानी । स्वरूपसिध्दी ज्याच्या मनी ।
म्हणूनि तो श्रेष्ठ जनी । विभूती म्हणूनी ।।६३।।
सर्वच सिध्दीची सांगता । पावेल जेव्हा तो स्वरूपता ।
तेव्हाच लाभे सार्थकता । मानव जन्मी ।।६४।।
नाना प्रकारच्या नाना सिध्दी । सर्वाहुनी थोर स्वरुप सिध्दी ।
ज्या सिध्दीने लाभे अक्षय वृध्दी । अमरत्वाची ।।६५।।
स्वरूपसिध्दीची प्राप्ती झाली । ऐसी भाग्यता जया लाभली ।
त्याची अपार पुण्याई फळा आली । अनंत जन्माची ।।६६।।
अनंत जन्मीचे अनंत पुण्य । पराभक्तिने झाला धन्य ।
ब्रह्मज्ञाने सदा संपन्न । शोक कामना निमाली ।।६७।।
सर्व काही पूर्णत्व लाभले । सर्व सुख ज्यांनी मिळविले ।
आनंद भरे संसारा देखिले । आत्मसुखाचिया ।।६८।।

अवघा सुखी संसार केला । ब्रह्मानंदे जीव भरला ।
जीवा शिवाच्या एकत्वाला । सिध्द झाला ज्ञानी ।।६९।।
आपुले स्वरूप ब्रह्मरूप । ऐसा विश्वास आपोआप ।
अंतरी ठसता निश्चयरूप । तेव्हा स्वरूपी पावला ।।७०।।
स्वरूपाची ओळख होता । देहभावाची नुरे वार्ता ।
निश्चये पावली स्वरूपता । स्व-स्वरूपाची ।।७१।।
देहभाव ज्यांचा गेला । स्व-स्वरूपी भाव रंगला ।
सोऽहम् भाव तोही ठसला । सत्यरूपे ।।७२।।
करणे वा न करणे नाही त्याला । दैवावरी देह टाकिला ।
अंतर्बाह्य मोकळा झाला । निःशंकपणे ।।७३।।
आपुल्या ठायी ब्रह्मानंदी । त्याला नाही कसली बंदी ।
बंधातूनि गेला स्वानंदी । निर्विषयपणे ।।७४।।

जेथे तेथे ब्रह्मरूप । अंतर्बाह्य तेचि रूप ।
वृत्ती लागली आपोआप । स्वरूपाठायी ।।७५।।
विषयी गोडी नाही काही । सहज प्राप्त भोगीत राही ।
आपपर भेद कांही नाही । एकपणे ।।७६।।
प्रारब्ध भोगातूनी मोकळा । पाप–पुण्याचा क्षय झाला ।
साक्षीत्वाने राहू लागला । विश्वकल्याणी ।।७७।।
विश्व कल्याणाचे नच बंधन । परी सहज स्वभावे जनकल्याण ।
बंधमोक्षाचे नच कारण । त्यातुनी ।।७८।।
बंधमोक्षाची जी कल्पना । ती न शिवे त्याच्या मना ।
एकत्वे पाही सर्व जना । ब्रह्मरूप म्हणूनी ।।७९।।
तयासी नाही कसले बंधन । त्याचे मन राहे सहज उन्मन ।
अंतरी त्यांच्या ब्रह्मस्फुरण । सदा सर्वकाळ ।।८०।।

आपपर भाव तुटला । जीव शिव भेद गेला ।
शिवरूपे जो रंगला । अभेदत्वे ।।८१।।
लागली होती जी उपाधी । त्यातूनि सुटली ती बुध्दी ।
म्हणूनि लाभली सिध्दी । आत्मरूपाची ।।८२।।
पराशांतीने जो भारला । ब्रह्मानंदे तो भरला ।
ज्ञान सिध्दांताने बिंबला । पराभक्तीने ।।८३।।
कांहीच न करणे त्याला । स्वभावे जे येई मनाला ।
ते तो जरी करीत चालला । तरी तो मुक्त ।।८४।।
कोण करतो कोण भोगतो । कर्तृत्व भोक्तत्वातून सुटतो ।
ब्रह्मानंदी सहजचि राहतो । आपुल्या ठायी ।।८५।।
कामना वासना निमाली । वृत्ती समाधानी झाली ।
अंतर्बाह्य दृष्टी लागली । ब्रह्मरूपी ।।८६।।

आत्मस्वरूपी संतुष्ट । मुक्तपणे वागणे इष्ट ।
ब्रह्मज्ञानी सर्व श्रेष्ठ । भूमंडळी ।।८७।।
ब्रह्मज्ञानाची अनुभूती । शब्दातीत त्याची स्थिती ।
शब्दाहूनि परमस्थिती । भावातीत असे ।।८८।।
ब्रह्मज्ञानी जो झाला । तो परमसौख्या लाभला ।
अमरपदी जाऊनी बैसला । न ढळे जेथूनी।।८९।।
परमश्रेष्ठ पुरूषार्थी । परम पावन पुण्यार्थी ।
परमस्थिती सुखार्थी । ब्रह्मनिष्ठ असे ।।९०।।
ब्रह्मज्ञानी जीवनमुक्त । आत्मज्ञानी देहातीत ।
सुख भोगी विषयातीत । परमसुखाते ।।९१।।
देवभाव ज्यांचा गेला । सहजस्वभावे वर्ततो भला ।
अंतर्यामी रंगूनि गेला । ब्रह्मसुखानंदी ।।९२।।

अहंता ममतेचे झाले निरसन । देहभावाचे तुटले बंधन ।
सर्वाठायी आत्मदर्शन । होय समत्वबुद्धीने ।।९३।।
ब्रह्मज्ञानी सदा प्रसन्न । अंतरी असे सुख संपन्न ।
सहजस्थितीत जे निघे वचन । तेच सिद्धांत शास्त्र ।।९४।।
ब्रह्मनिष्ठ मंगलमूर्ती । परम पावन ती विभूती ।
दर्शने स्पर्शे पावन होती । बद्धजन ।।९५।।
ब्रह्मपुरुषाचे होता दर्शन । पाप तापादि होती हरण ।
जन्म मृत्यूचे बंधन । तात्काळ जाती ।।९६।।
ब्रह्मज्ञानी जेथे आला । पावित्र्य येईल त्या स्थळा ।
त्याच्या स्पर्शे सर्वत्राला । लाभे खरी कृतार्थता ।।९७।।
ब्रह्मस्थिती अक्षय सुखाची । त्याची प्राप्ती करावी साची ।
स्वरूपाकार वृत्ती ज्याची । तो सदा परिपूर्ण ।।९८।।

अनंताच्या अंतरंगात । ज्याची वृत्ती गेली त्यात ।
तो सुख भोगी अंतरात । भावानंदी ।।९९।।
ब्रह्मभाव ज्याचा स्वभाव तो । स्वभावे रंगून जातो तो ।
रंगून रंगून आपण होतो । सिद्धानंद ।।१००।।
सिद्ध सिद्ध सिद्धानंद । जया म्हणती परमानंद ।
आनंदे आनंद सुखानंद ।अमर अक्षय तत्त्वाचा ।।१०१।।

।। ॐ आनंद आनंद आनंद ।।

।। मनोगत ।।

कोण काय सांगते । आत्मसात काय होते ।
काय रुचते पचते । भिन्न भिन्न ।।१।।
मग काय करावे । ईश्वरास कैसे पहावे ।
संन्यासी की प्रापंचिक व्हावे । गुंगली मती ।।२।।
वेद उपनिषद गीता । आत्मपूजा सांगता ।
आत्मदेव भजता । लाभे पूर्णत्व ।।३।।
सर्व विश्व ब्रह्ममय । स्वरूप आपुले ज्ञानमय ।
जीव शिव ऐक्य होय । ऐसे करावे ।।४।।
ऐसे घेतले सार । प्रियोत्तम तत्त्वविचार ।
अवतरले भूवर । इच्छा योगेश्वरीची ।।५।।

वदे प्रियोत्तम ब्रह्मश्री । आत्मपूजेत इतिश्री ।
सोऽहमभावे सर्वश्री । समस्त मानवा ।।६।।
गुरुकृपेने लाभते । साधनेने साधते ।
बुद्धी आत्मबल लागते । आनंदी आनंद ।।७।।
या ग्रंथी निवेदिले । ते ब्रह्मवाक्य भले ।
प्रियोत्तमानंदाने अनुभविले । जे स्वत: ।।८।।
हा नसे शब्दांचा खेळ । पांडित्याचा कोलाहल ।
ग्रंथ प्रकाशनाचा मेळ । साधिला गुरुदासे ।।९।।

– प्रि. ब्रह्मानंद स्वामी (गुरुदास)

।। पीठस्वामीनी यांचा परिचय ।।



प्रि.सौ.चैतन्यवती (ऋतंभरा देवी) म्हणजे नांदेडचे इतिहास संशोधक श्री. तात्यासाहेब कानोले यांची नात तर सौ.दर्शना व श्री.मोहन कानोले यांची कन्या. पतीचे पूर्ण नाव निशीथ जयंत सावरकर.
ठेंगणा बांधा, गौर वर्ण व बुद्धीवैभव. वैद्यकशास्त्रात एम.बी.बी.एस., डी.सी.एच. ही पदवी प्राप्त करुन त्या वैद्यक व्यवसायात पुणे येथे बाल रोग तज्ज्ञ आहेत.

इथे कांही तरी वेगळे आहे हे जाणले व बुद्धीवैभव, आत्मवैभवाकडे वळले. जन्म १९७५ चा. लहान मुलांचे रोग हटविणारी बुद्धी तरुण वयातच भवरोग नाहीसा करण्याकडे वळली.

पतीच्या संमतीने त्यांनी गुरुचरणी सर्व समर्पण केले आहे. निश्चय आत्मलाभाचा, श्री गुरुची कृपा व प्रपंच अध्यात्माचा असे त्या राहतात. मी सर्वस्वी श्री गुरुची आहे असे त्या म्हणतात.

।। अष्टोतरी सद्गुरु प्रियोत्तम नाभावली।।

१) ॐ मंगलमूर्ती ब्रह्मश्री प्रियोत्तमाय नमः।

२) ॐ विद्यारत्न प्रियोत्तम माऊली नमो नमः ।

३) ॐ सिद्धगुरु कृपामूर्ती प्रियोत्तमाय नमः।

४) ॐ गोदा - किसनसुता प्रियोत्तमाय नमः ।

५) ॐ अंबानंदना प्रियोत्तमाय नमः।

६) ॐ योगिनी योगेश्वरा प्रियोत्तमाय नमः।

७) ॐ राधाहृदयेश्वरी प्रियोत्तमाय नमः।

८) ॐ ऋतारमणा प्रियोत्तमाय नमः।

९) ॐ चैतन्यमय प्रियोत्तम अवतारी पुरुषाय नमः।

१०) ॐ प्रियोत्तम धर्म पुरुषाय नमः।

११) ॐ सिद्धबोध क्षेत्र निवासी प्रियोत्तमाय नमः।

१२) ॐ राधा–प्रियोत्तम–सरस्वतीदेवी हृदनिवासी प्रियोत्तमाय नमः।

१३) ॐ प्रियोत्तम पीठ संस्थापका प्रियोत्तमाय नमः।

१४) ॐ सोऽहम् धारका प्रियोत्तमाय नमः।

१५) ॐ आत्मनिवासी प्रियोत्तमाय नमः।

१६) ॐ सतिराज जीवना प्रियोत्तमाय नमः।

१७) ॐ प्रिती माऊली प्रियोत्तमाय नमः।

१८) ॐ स्वानंदेशाय प्रियोत्तमाय नमः।

१९) ॐ आत्मतृप्त प्रियोत्तमाय नमः।

२०) ॐ अपौरूषेयवाणी प्रसवका प्रियोत्तमाय नमः।

२१) ॐ तीर्थराज प्रियोत्तमाय नमः।

२२) ॐ संचारधारका प्रियोत्तमाय नमः।

२३) ॐ सिद्धज्ञान यज्ञा पुरुषा प्रियोत्तमाय नमः।

२४) ॐ कृषिधारका प्रियोत्तमाय नमः।

२५) ॐ वृषभ वाहना प्रियोत्तमाय नमः।

२६) ॐ ब्रह्मश्री ब्रह्मभूषणा प्रियोत्तमाय नमः।

२७) ॐ भगवान ज्ञानवैराग्य श्रीमान प्रियोत्तमाय नमः।

२८) ॐ ब्रह्मविद्या देवी प्रेरका प्रियोत्तमाय नमः।

२९) ॐ सहस्त्रनामी भक्ता प्रियोत्तमाय नमः।

३०) ॐ ज्ञानी तपराजा प्रियोत्तमाय नमः।

३१) ॐ सत्यवंता प्रियोत्तमाय नमः।

३२) ॐ प्रज्ञावंत प्रतिभाराजा प्रियोत्तमाय नमः।

३३) ॐ ब्रह्मतपस्वी प्रियोत्तमाय नमः।

३४) ॐ अखंड ज्ञान प्रसवका प्रियोत्तमाय नमः।

३५) ॐ सच्चिदानंद स्वरूपा प्रियोत्तमाय नमः।

३६) ॐ शक्तिपूजका प्रियोत्तमाय नमः।

३७) ॐ एकविधा प्रियोत्तमाय नमः।

३८) ॐ भक्तभूषणा प्रियोत्तमाय नमः।

३९) ॐ अभक्त रक्षका प्रियोत्तमाय नमः।

४०) ॐ प्रियोत्तमा आई प्रियोत्तमाय नमः।

४१) ॐ अखंड स्वरूप चिंतका प्रियोत्तमाय नमः।

४२) ॐ आत्मज्ञानी पुरुषा प्रियोत्तमाय नमः।

४३) ॐ भक्तिज्ञाने सुसंपन्न प्रियोत्तमाय नमः।

४४) ॐ सिद्ध पुरुषा प्रियोत्तमाय नमः।

४५) ॐ प्रियोत्तमादेवी भक्ता प्रियोत्तमाय नमः।

४६) ॐ अंबादेवी परमप्रिया प्रियोत्तमाय नमः।

४७) ॐ योगेश्वरी सच्चिदानंद स्वरूपिणी प्रियोत्तमाय नमः।

४८) ॐ एकनिष्ठ भक्ता प्रियोत्तमाय नमः।

४९) ॐ प्रियोत्तम तत्व प्रसवका प्रियोत्तमाय नमः।

५०) ॐ वेद–उपनिषद–गीता बालका प्रियोत्तमाय नमः।

५१) ॐ दीप पूजका प्रियोत्तमाय नमः।

५२) ॐ त्रिरूप दुर्गा कवचधारी प्रियोत्तमाय नमः।

५३) ॐ पूर्ण वस्त्रधारी प्रियोत्तमाय नमः।

५४) ॐ जितेन्द्रिया प्रियोत्तमाय नमः।

५५) ॐ विचारवंता प्रियोत्तमाय नमः।

५६) ॐ सद्गुरु भक्ता प्रियोत्तमाय नमः।

५७) ॐ सगुण निर्गुण साक्षात्कारी प्रियोत्तमाय नमः।

५८) ॐ दृढ परोक्ष ज्ञानी प्रियोत्तमाय नमः।

५९) ॐ वा.कि. तत्त्वचिंतका प्रियोत्तमाय नमः।

६०) ॐ रावसाहेब–आप्पा प्रियोत्तमाय नमः।

६१) ॐ राधाकृष्ण अवतारी पुरुषा प्रियोत्तमायनमः ।

६२) ॐ ज्ञानदेवी प्रियोत्तमाय नमः।

६३) ॐ वेदवेदान्ती प्रियोत्तमाय नमः।

६४) ॐ परम मंगला प्रियोत्तमाय नमः।

६५) ॐ परमहंस ज्ञानसूर्य प्रियोत्तमाय नमः।

६६) ॐ तत्त्वज्ञानी पुरुषा प्रियोत्तमाय नमः।

६७) ॐ ब्रह्मश्री ब्रह्मपुरुषा प्रियोत्तमाय नमः।

६८) ॐ ब्रह्मनिष्ठ ब्रह्मतेजी प्रियोत्तमाय नमः।

६९) ॐ ब्रह्मभगवंता प्रियोत्तमाय नमः।

७०) ॐ जाणीव राजा प्रियोत्तमाय नमः।

७१) ॐ ज्ञानमूर्ती सदाशिवा प्रियोत्तमाय नमः।

७२) ॐ स्वयंस्वरूपा प्रियोत्तमाय नमः।

७३) ॐ प्रियोत्तम भोगराजाय नमः।

७४) ॐ प्रियोत्तम अक्षय राजाय नमः ।
७५) ॐ ज्ञान अवतारी पुरुषा प्रियोत्तमाय नमः।
७६) ॐ साध्या माणसा सिद्धा प्रियोत्तमाय नमः।
७७) ॐ सर्व मुक्त पुरुषा प्रियोत्तमाय नमः।
७८) ॐ ब्रह्म तपस्वी प्रियोत्तमाय नमः।
७९) ॐ सत्य-शील-धर्म पुरुषा प्रियोत्तमाय नमः।
८०) ॐ प्रियोत्तमा बालका प्रियोत्तमाय नमः।
८१) ॐ शांती व्रती प्रियोत्तमाय नमः।
८२) ॐ स्वरूप प्रिया प्रियोत्तमाय नमः।
८३) ॐ आत्मतृप्त सुखराजा प्रियोत्तमाय नमः।
८४) ॐ निरहंकारी प्रियोत्तमाय नमः।
८५) ॐ ब्रह्मेश्वरी प्रियोत्तमाय नमः।
८६) ॐ ब्रह्मवेत्ता प्रियोत्तमाय नमः।

८७) ॐ चैतन्यराजा प्रियोत्तमाय नमः।

८८) ॐ प्रियोत्तम महात्मा प्रियोत्तमाय नमः।

८९) ॐ विज्ञान संपन्न प्रियोत्तमाय नमः।

९०) ॐ ब्रह्मविद्यादेवी प्रियोत्तमाय नमः।

९१) ॐ दर्शनकार प्रियोत्तमाय नमः।

९२) ॐ सिद्धबोधी तेजोमयज्ञान राजा प्रियोत्तमाय नमः।

९३) ॐ संतमहात्मे ज्ञानप्रसवका प्रियोत्तमाय नमः।

९४) ॐ आत्ममार्गी पुरुषा प्रियोत्तमाय नमः।

९५) ॐ प्रियोत्तमा स्वरूपा प्रियोत्तमाय नमः।

९६) ॐ आत्महित सिद्धा प्रियोत्तमाय नमः।

९७) ॐ बालवयी दर्शका प्रियोत्तमाय नमः।

९८) ॐ यशवंता जयवंता प्रियोत्तमाय नमः।

९९) ॐ शुभप्रवर्तका प्रियोत्तमाय नमः।

१००) ॐ मंगलदायक परमसिद्धा प्रियोत्तमाय नमः।
१०१) ॐ सद्गुरू स्वरुपा प्रियोत्तमाय नमः।
१०२) ॐ सूक्ष्म भाव द्रष्ट्या प्रियोत्तमाय नमः।
१०३) ॐ प्रेरका ध्येय पुरुषा प्रियोत्तमाय नमः।
१०४) ॐ प्रियोत्तम विचारका प्रियोत्तमाय नमः।
१०५) ॐ आत्मसामर्थ्यवान प्रियोत्तमाय नमः।
१०६) ॐ विकारमुक्त पुरुषा प्रियोत्तमाय नमः।
१०७) ॐ सत्यम् शिवम् सुंदरा प्रियोत्तमाय नमः।
१०८) ॐ साधान साधका श्रीयोगेश्वरी स्वरूपाय नमः ।

ॐ सोऽहम्

॥ गुरुवंदना ॥

ॐ

प्रियोत्तमानंद माझे गुरु
ज्ञानाचे कल्पतरु
भगवतीचे भक्त भारू
तया वंदन माझे.

सदा सर्वदा शांत रूप
निर्विकार प्रसन्न स्वरूप
अंतर्यामी सोऽहम् स्वरूप
तया वंदन माझे.

मी आहे त्यांना शरण
अनन्यभावे करितो वंदन

आत्मस्वरूपी राहे माझे मन
वंदन माझे गुरुला
रात्रंदिन सेवाभाव
पूज्य मंगल नम्र रहाव
तया पुसोनी आत्मभाव
वंदन करितो.
आम्ही दोघे त्यांना अनन्य
सदा न सदा एक भाव ठेवून
स्वरूपाचे ज्ञान आम्हा देऊन
कृतार्थ करावे.
प्रियोत्तमाला वंदन अमुचे.

****

सद्गुरु ब्रह्मश्री प्रियोत्तमानंदाची ग्रंथ संपदा

अ.क्र.	ग्रंथाचे नाव	अ.क्र.	ग्रंथाचे नाव
१)	प्रियोत्तम योग	२)	प्रियोत्तम महामंत्र
३)	प्रियोत्तम महिमा	४)	प्रियोत्तम प्रकाश
५)	सोऽहम् भाव (जपदीप संपादित)	६)	प्रियोत्तम तत्त्व विचार।
		७)	प्रियोत्तम साधन सिद्धी
८)	प्रियोत्तम सोऽहम् भाव	९)	प्रियोत्तम भाव बोध
१०)	प्रियोत्तम स्वरूप सिद्धी	११)	प्रियोत्तम तत्त्वज्ञान
१२)	प्रियोत्तम तत्त्ववाणी	१३)	प्रियोत्तम ग्रंथ साहित्य सार
१४)	आत्मपद	१५)	माझे हितगुज माझ्याशी

सद्गुरु ब्रह्मश्री प्रियोत्तमानंदाची ग्रंथ संपदा

अ.क्र.	ग्रंथाचे नाव	अ.क्र.	ग्रंथाचे नाव
१६)	परमार्थ हा पुरुषार्थ	१७)	विचार लहरी
१८)	उजळल्या दिशा	१९)	जीव शिव ऐक्य
२०)	ब्रह्मज्ञानच सांगे गीता	२१)	ब्रह्मसूत्र
२२)	उपनिषद ब्रह्मासार	२३)	प्रियोत्तम गाथा
२४)	सिद्धबोध	२५)	गुजगोष्टी
२६)	निजबोध	२७)	मला सांगवं वाटत
२८)	ब्रह्मश्री प्रियोत्तम	२९)	मी
३०)	चिंतन	३१)	ब्रह्म उपासना

सद्गुरु ब्रह्मश्री प्रियोत्तमानंदाची ग्रंथ संपदा

अ.क्र.	ग्रंथाचे नाव	अ.क्र.	ग्रंथाचे नाव
३२)	गुरु उपासना	३३)	योगेश्वरी उपासना
३४)	वृत्तीची परमवृत्ती	३५)	आत्मपूजा
३६)	महावाक्य बोध		

वरील वाङ्मय प्रियोत्तम भक्त मंडळींनी प्रकाशित केलेले आहे.

वरील ग्रंथ मिळण्याचे ठिकाण

श्री प्रियोत्तमानंद आश्रम

सिद्धबोध क्षेत्र, मु.पो. सावरगाव, व्हाया आष्टी (धो.जोडा)

ता. परतुर, जि. जालना. फोन : (०२४८४) २२९०६८

अल्प मनोगत





सद्गुरुला शरण जावे। ईश्वराला आळवावे। सोऽहम् भावे साधावे । स्व स्वरुप मानवी जीवन दोन स्तरावर विचारात घेतल्यास बुध्दी व अंत:करणाचे गुणधर्म व्यवहार व स्व स्वरुप असे विभागता येतात. परंतु आत्मरुप व्यवहार हा केव्हाही श्रेष्ठ असतो.

बोध असावा आत्मरुपाचा, त्याकरिता वाचन "आत्मपूजेच" व चिंतन मननही त्याचेच देह आहे तोवर व्यवहार आहे. त्यांचे संगोपन आवश्यक आहे पण आत्मपूजेचा विसर पडू देऊ नये.

भक्तीज्ञाने सुसंपन्न ब्रह्मस्मी प्रियोत्तमानंद महाराज यांनी "आत्मपूजा" ग्रंथ प्रकाशित करण्यास अनुमती दिल्यामुळे आमच्या कुटुंबाचा आनंद द्विगुणित झाला असून "आत्मपूजा" ग्रंथ प्रकाशित करुन श्री सद्गुरु चरणी समर्पित करीत आहोत.

आपणही "आत्मपूजेचे" नियमीत श्रवण, वाचन, मनन, चिंतन करुन परमानंद परमप्रेमाचा आत्मलाभ करुन घ्यावा व कृतार्थ व्हावे हिच सर्व श्रध्दाळू परमभक्तांना नम्र विनंती.

संत प्रियोत्तम कहे हमारा।
आत्मग्यान बीन नही सहारा।।

परमभक्त श्री चरणी विनीत
गजानन त्रंबक धोकटे
सौ. सविता गजानन धोकटे
संगमनेर. मो ९८८१७४१६७६